आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

# शेतकरी संघटक

२१ ऑगस्ट २०११ | वर्ष २८ | अंक १०

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹ १०



राष्ट्रीय भूसंपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत विधेयक

## नेहरूंची घोडचूक निस्तरण्याचा जयरामजींचा खटाटोप

शरद जोशी

# पेटलेले पाणी स्फोटक धरणी

## आधी जैतापूर आता मावळ आता अजून पुढे काय ?

## जमीन अधिग्रहणाविरोधात शेतकऱ्यांमध्ये वाढता असंतोष

## शक्तीमान लोकपाल नको, सक्षम पंतप्रधान हवा

अण्णा हजारे यांचा दुराग्रह मान्य केला तर लोकपाल यंत्रणेवर कार्यकारी देशाला ५०००० ते ८०००० कोटींचा खर्च येईल. आजची नोकरशाही पोसणाऱ्या भारतीय जनतेच्या दुःखात त्यामुळे अधिकच भर पडेल.

— सुधाकर जाधव

## आर्थिक जगबुडी

प्रशासन तथा राज्यशासन चालवणाऱ्या संस्था, लोक हे कार्यक्षम, निष्कलंक तसेच भ्रष्टाचारापासून मुक्त असणे नितांत गरजेचे आहे, कारण झालेले आर्थिक नुकसान भरून येऊ शकते, पण गेलेली पत पुन्हा मिळवणे फार अवघड असते.

— श्रीकृष्ण उमरीकर

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १० । २१ ऑगस्ट २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


शरदऋतू
**नेहरूंची घोडचूक निस्तरण्याचा जयरामजींचा खटाटोप**
शरद जोशी ........ ३

निमित्त
**आदरणीय शरद जोशी**
श्याम पवार ........ ५

आजकाल
**पेटलेले पाणी स्फोटक धरणी**
ज्ञानेश्वर शेलार ........ ७

चर्चा
**नवे भूसंपादन विधेयक आहे तरी काय?**
ॲड. प्रकाशसिंह पाटील ........ ९

कॉमन नॉन सेन्स
**शक्तिमान लोकपाल नको, सक्षम पंतप्रधान हवा!**
सुधाकर जाधव ........ ११

जागरण
**आर्थिक जगबुडी**
श्रीकृष्ण उमरीकर ........ १४

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १८

वाङ्मय शेती
**बरे झाले देवाबाप्पा**
गंगाधर मुटे ........ २२

भारत की जुबानी
**हमें क्या चाहिये?**
ॲड. दिनेश शर्मा ........ २५

(उ)संतवाणी
**पाणी साठे उद्ध्वस्त करा**
'थंडा' महाराज देगलूरकर ........ २८

अभिजात वाङ्मय
**गोदान**
मूळ लेखक : मुन्शी प्रेमचंद, अनु. अनंत उमरीकर ........ २९

# राहूलबाबा हे काय केले !

उत्तर प्रदेशात शेतकऱ्यांच्या जमिनीसंदर्भात राहूल गांधी काहीतरी करायला काय गेले आणि त्यातून भलतेच काय निघाले? मायावतींच्या विरोधात आंदोलन छेडत सामान्य शेतकऱ्यांची बाजू आपण घेतो आहोत असं दर्शविणाऱ्या राहूल गांधींना ही कल्पना नव्हती, भारतभर नेमकी उलटी परिस्थिती आहे. काँग्रेसचं शासन आहे त्या सर्व राज्यांतही शेतकऱ्यांवरती जमिनींबाबत असाच अन्याय वर्षानुवर्षे होत राहिला आहे. परवाच्या मावळच्या गोळीबारात बळी पडलेल्या शेतकऱ्यांच्या रक्ताने ही गोष्ट परत एकदा अधोरेखित झाली आहे. मुख्यमंत्री मायावतींनी दिलेलं उत्तर राजकीय असलं तरी मोठं मार्मीक आहे. जमिनीशी संबंधित सर्व कायदे ही केंद्राच्या अखत्यारितली बाब आहे आणि केंद्रात काँग्रेस आघाडीचं सरकार आहे. आता राहूलबाबा काय करणार? निघाले होते चोर पकडायला आणि चोरीचा मुद्देमाल आपल्याच घरात सापडावा, चोराला प्रशिक्षण देण्याची व्यवस्थाही आपल्याच घरातून व्हावी आणि पुढे चोराला अभयही आपल्याच घरात दिलं जावं असं मोठं विचित्रच घडलं की!

राहूल गांधींचे जे कोणी सल्लागार असतील त्यांचं कदाचित कायद्याचं ज्ञान अपूरं असेल किंवा त्यांनी मुद्दामच चूक सल्ला राहूल गांधींना दिला असणार. एकतर जी गोष्ट काँग्रेसने आधीपासून करायची होती, तिचा नेहरूंपासून सगळ्यांनाच विसर पडला. ती म्हणजे सर्वसामान्यांशी जवळीक साधत संवाद साधणे! म्हणून तर १४ ऑगस्टच्या मध्यरात्री लाल किल्ल्यावर नेहरूंच्या हस्ते तिरंगा फडकत असताना महात्मा गांधी मात्र दिल्लीपासून शेकडो मैल दूर होते. पश्चिम बंगालात नौआखालीमध्ये दंगलग्रस्तांचे अश्रू पुसणारे त्यांचे हात कोणालाच दिसत नव्हते. ३० जानेवारी १९४८ ला नथुराम गोडसे याने तमाम काँग्रेसजणांची मोठ्या धर्मसंकटातून सुटका केली. गांधीजींचा नैतिक दबाव कोणालाच नको होता. त्यांचा खून परस्पर झाला हे बरेच झाले, असं काँग्रेसजणांना वाटत असणार. सत्ता गेली अथवा डळमळली की काँग्रेसच्या धुरिणांना आणि विशेषत: गांधी कुटुंबियांना लोकांचा उमाळा येतो. त्यामुळेच इंदिरा गांधी बिहारमध्ये पुराने वाहणारी नदी हत्तीच्या पाठीवर बसून ओलांडतात. राजीव गांधी उन्हातान्हात ओरिसाच्या आदिवासी भागात दौरे काढतात; पण हे सगळं फक्त सत्ता नसताना! आताही जेव्हा मोठमोठे घोटाळे समोर यायला लागले, अडकलंय कोण याचा शोध घेण्यापेक्षा अडकलं कोण नाही हे शोधणं सोपं जावं अशी परिस्थिती आणि राहूल गांधी अशावेळी सर्वसामान्यांचे अश्रू पुसण्याचे नाटक करण्यासाठी का होईना; पण प्रत्यक्ष त्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचत आहेत. भलेही यातून काहीही निष्पन्न न होवो. राहूलबाबांनी त्यांच्याही नकळत त्यांच्या पणजोबाच्या एका विचित्र कायद्याला हात घातला आहे. जमीन अधिग्रहणाच्या संदर्भामध्ये अतिशय जुलमी आणि केवळ सुलतानशाहीतच शोभावा असा इंग्रजांनी केलेला जुनाट कायदा आजही आपल्या देशात चालू आहे. याचा साक्षात्कार राहूल गांधींना काँग्रेसच्या कुठल्याही राज्यात झाला नाही. झाला तो उत्तर प्रदेशात! गेल्या २१ वर्षांपासून जिथल्या सत्तेत काँग्रेसला वाटा राहिलेला नाही. म्हणजे परत एकदा केवळ राजकारणासाठी राहूल गांधी यांनी या प्रकरणाला हात घातला; पण त्यातून निघालं ते भलतंच. आता या निमित्ताने एकूणच जमीन अधिग्रहण कायद्याचा केंद्रीय शासनाला विचार करावा लागणार आहे. राहूल गांधींच्या निमित्ताने का होईना हा विषय ऐरणीवर आला हे बरेच झाले. आता गरज आहे ती प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची. या प्रश्नावर भाजप आणि काँग्रेसमध्ये काहीही फरक नाही. भाजपच्या राजवटीतही हा विषय त्यांनी चर्चेला घेतला नव्हता. किंबहुना, घटनेच्या नवव्या परिशिष्टाला कोणीच हात लावू इच्छित नव्हते. हे सगळं घडतं आहे. ते काँग्रेसला सर्वसामान्यांचा कळवळा आला म्हणून नव्हे, जागतिक पातळीवर घडणाऱ्या मोठमोठ्या उलाढाली आपल्या एकूणच व्यवस्थेवर प्रचंड दबाव टाकत आहेत. आम्ही मांडलेल्या समाजवादी संरचनेतल्या कचकड्याच्या बाहुल्या या नवीन रेट्यात पार कोलमडून गेल्या आहेत. आम्हाला बदल करणं भागच आहे; पण तो आम्ही आतापर्यंत करत नव्हतो. कुठल्याही कारणाने का होईना काहीएक बदल करण्याची निदान तयारी तरी आम्ही दाखवली हेही खूप झालं; पण यातून जे काही बाहेर येईल त्याचा कुठलाच फायदा काँग्रेसला होण्याची शक्यता नाही, कारण हे त्यांचंच गेल्या ५० वर्षांतलं पाप आहे. आरक्षण चित्रपटात प्रतिक बब्बर शेवटच्या प्रसंगात आपल्या भ्रष्ट बापाच्या विरोधात उभं राहतो आणि त्याला संस्थेवरून निष्काशित करण्याची विनंती हेमामालिनीला करतो. तसंच काहीसं राहूल गांधी यांना करावं लागणार आहे आणि ही विनंती त्यांना त्यांच्या आईलाच करावी लागेल. माझ्या वडिलांनी नाही त्यांच्या आईनेही नाही, तर तिच्याही वडिलांनी केलेली पापं आपण धुवून टाकूयात आणि असं केलं, तर आणि तरच आपला निभाव लागू शकेल. अन्यथा आपला निभाव लागणे कठीण आहे.



पण असे होणार नाही. भारतीय राजकारणाचा दिग्दर्शक प्रकाश झा नाही. खरे तर ही परिस्थिती काँग्रेसच्याही ताब्यात उरलेली नाही. एक विचित्र अशी अवस्था आज प्राप्त झालेली आहे. आणि त्यामुळेच स्पष्टपणे मर्यादा कळत असूनसुद्धा सर्वसामान्य लोक अण्णा हजारेंना प्रतिसाद देत आहेत. राहूलबाबा हे तुम्ही काय केलंत? नको त्या विषयाला हात घातलात आता बघूत त्याची काय फळं मिळतात!!

## राष्ट्रीय भूसंपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत (भूसंपुपु) विधेयक




# नेहरूंची घोडचूक निस्तरण्याचा जयरामजींचा खटाटोप

केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास खात्याचे नवे मंत्री जयराम रमेश यांनी नुकतेच त्यांच्या खात्याच्या संकेतस्थळावर 'राष्ट्रीय भूसंपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत (भूसंपुपु) विधेयक २०११'चा म्हणजे 'National Land Acquisition and Rehabilitation & Resettlement (LARR) Bill 2011'चा मसुदा इंग्रजी व हिंदी भाषांमधून प्रकाशित केला असून त्यावरील जनतेची मते ३१ ऑगस्ट २०११ पर्यंत मागविली आहेत. जवळजवळ ७० पानांचा असा हा अगडबंब मसुदा आहे. जयराम रमेश तसे विस्तृत दस्तावेज बनविण्याबद्दल प्रसिद्धच आहेत; बीटी वांग्यासारख्या, त्या मानाने किरकोळ विषयावरही त्यांनी किती प्रचंड दस्तावेज बनविले होते हे सर्वांना आठवतच असेल. तसे ते एक एक पायरी वर वर चढत जाण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे मंत्री आहेत.

औद्योगिक विकास, संरचनात्मक विकास, विशेष आर्थिक क्षेत्र इत्यादिसारख्या कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीचे संपादन करण्याची तरतूद भूसंपुपु विधेयकाच्या या मसुद्यात आहे.

खरे तर पंडीत जवाहरलाल नेहरूंनी स्वतंत्र भारतात सोव्हिएट रशियन छापाच्या समाजवादी अर्थव्यवस्थेचे त्यांचे आवडते खेळणे आणले नसते तर औद्योगिक आणि संरचनात्मक विकासाचे कार्यक्रम राबवितांना ज्या समस्या निर्माण होतात त्या मुळात निर्माणच झाल्या नसत्या. शेतीक्षेत्राबद्दल नेहरूंच्या मनात, का कोण जाणे, पक्की अढी होती, त्यापोटी त्यांनी जमीनदारीप्रथा नष्ट करून आणि सावकारी मोडून काढून ग्रामीण भागातील नेतृत्वच खलास केले. सावकारांच्या जागी शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्यासाठी बाबू लोकांनी चालविलेल्या सहकारी संस्थांचे जाळे निर्माण करण्यात आले. आणि, परिणामी, शेतीत तयार होणारी बचत खेड्यात न रहाता तिचा ओघ नागरी वस्तीकडे वळला. त्याच्या जोडीला नेहरूंनी शेतमालाचे भाव पाडण्याचेही धोरण जाणूनबुजून आखले आणि निष्ठूरपणे राबवले. सोव्हिएट रशियन छापाची ही धोरणे स्वतंत्र भारतावर लादली गेली नसती तर आज जयराम रमेश ज्या समस्यांची यादी आपल्या भूसंपुपु विधेयकाच्या मसुद्यात देत आहेत त्या समस्या मुळातच उद्भवल्या नसत्या.

जपान हे मोठे बोलके उदाहरण आहे. अगदी १९२१ सालापासून जपानने त्यांच्या भात उत्पादक शेतकऱ्यांना भाताच्या आंतरराष्ट्रीय भावाच्या चौपट भाव देण्याचे धोरण अवलंबिले. परिणामी, जपानी शेतकऱ्यांनी मोठ्या हुरुपाने भाताचे विक्रमी उत्पादन घेतले आणि त्यातून तयार झालेल्या भांडवलाचा संचय अर्थातच शेतकऱ्यांच्याच हाती झाला. शेतकऱ्यांनी हाती जमा झालेल्या भांडवलाचा उपयोग करून वेगवेगळ्या औद्योगिक वस्तुंचे सुटे भाग बनविण्याचे कुटिरोद्योग सुरू केले. ग्रामीण भागात रोजगार निर्माण करणाऱ्या व ग्रामीण भागातील भांडवल तेथेच खेळते ठेवणाऱ्या या कुटिरोद्योगांमुळे जपानची संपूर्ण जगात ख्याती झाली. या कुटिरोद्योगांतून उत्पादित झालेल्या सुट्या भागांची जुळणी करणारे कारखानेही हळूहळू शेतकऱ्यांनीच उभे केले. परिणामी, जपानची महत्त्वाची आणि मोठी कारखानदारी जपानच्या ग्रामीण भागात विकसित झाली ज्यातील बव्हंश भांडवली गुंतवणूक शेतकऱ्यांच्या म्हणजे प्राथमिक उत्पादकांच्या खिशांतून झाली. साहजिकच, या कारखानदारीतील नफा पुन्हा शेतकऱ्यांच्या हाती आला. शिवाय, उद्योग व संरचना यांचा विकास, नागरीकरण इत्यादिसाठी निरंकुशपणे जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या जमिनी ओरबाडून घेण्याचा प्रसंगच उभा राहिला नाही. त्यामुळे, विस्थापितांचे पुनर्वसन व

पुनर्वसाहत असले उपद्‌व्यापही तेथील सरकारला करावे लागले नाहीत.

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने भारताच्या सर्व नागरिकांना काही मूलभूत हक्क बहाल केले आहेत त्यातील संपत्ती अधिकार हा एक आहे. त्यानुसार कोणताही नागरिक संपत्ती संपादन करू शकतो, ती बाळगू शकतो आणि त्याची मर्जी असेल तर तिची विल्हेवाटही लावू शकतो. स्वतंत्र भारतावर सोव्हिएट रशियन छापाची समाजवादी अर्थव्यवस्था लादल्यानंतर नेहरूंनी आणलेला जमीनदारी बरखास्तीचा कायदा नागरिकांच्या या मूलभूत हक्काचे उल्लंघन करणारा असे नोंदवून देशातील बहुतेक न्यायालयांनी फेटाळून लावला. सुरुवातीलाच बसलेल्या चपराकीने नाउमेद न होता नेहरूंनी मूळ घटनेतच दुरुस्ती करून नागरिकांच्या घटनादत्त संपत्तिअधिकाराचा संकोच केला आणि नागरिकांच्या संपत्तीचे संपादन करण्याचे अधिकार सरकारकडे घेतले व अशा प्रकरणात कोणाही नागरिकाला न्यायालयात दाद मागता येणार नाही अशी तरतूदही घटनेत करून टाकली. अशा प्रकरणांची यादी करण्यासाठी त्यांनी घटनेला नवव्या अनुच्छेदाची जोड दिली आणि या नवव्या अनुच्छेदात वर्षावर्षाला अशा प्रकरणांची भर घालीत राहिले. नागरिकांच्या संपत्ती अधिकाराला मूठमाती देण्याचे काम तेवढे त्यांनी त्यांच्या सुकन्या इंदिराजींसाठी शिल्लक ठेवले. नागरिकांच्या संपत्तिअधिकाराच्या या संकोचामुळे, भारताच्या घटनात्मक प्रणालीमध्ये ‘जमीन सगळी राजाच्या मालकीची (eminence juris)’ हे इंग्रजांची नक्कल करून घेतलेले तत्त्व घुसडले गेले. या तत्त्वानुसार, राष्ट्राची सर्व जमीन राजाच्या मालकीची, रयतेला ती फक्त कसण्यापुरती दिलेली असते आणि काही कायदेशीर सोपस्कारांनी ती रयतेकडून केव्हाही काढून घेता येते. भारतीय समाजव्यवस्थेला हे तत्त्व अपरिचित होते; भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जमीन ही त्या त्या गावाच्या मालकीची असे.

नवे ग्रामीण विकास मंत्री जयराम रमेश यांनी त्यांच्या भूसंपुपु विधेयकाचा मसुदा तयार करण्याआधी गृहपाठ व्यवस्थित केला असता तर जे दोघे, जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी, त्यांच्यासाठी जवळजवळ परमेश्वरासमान आहेत, त्या दोघांनी उभ्या केलेल्या समस्यांशी त्यांना हा मसुदा बनविताना सामना करावा लागणार आहे हे त्यांच्या ध्यानात आले असते.

पण, तसा काही गृहपाठ न करताच जयराम रमेशांनी आपल्या भूसंपुपु विधेयकाच्या मसुद्यात तरतुदींचे असे काही अघळपघळ आणि सर्वसमावेशक जाळे निर्माण करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे की आपले हात ओले करून घेण्याच्या संधी कितीतरी वाढणार आहेत हे लक्षात येताच हरेक नोकरदार हर्षभरित होऊन जाईल.

जवाहरलाल नेहरूंनी सोव्हिएट रशियन छापाच्या समाजवादी अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीसाठी उद्योगक्षेत्राच्या नाड्या हिंदू उच्चवर्णीयांच्या हाती दिल्या नसत्या आणि ग्रामीण भागातील कारागीर बलुतेदारांना उद्योगक्षेत्रावर त्यांच्या त्यांच्या मगदुरानुसार ताबा ठेवण्याची मुभा दिली असती तर समाजवाद आणण्याच्या त्यांच्या त्या विचित्र चुकीकडेही एकवेळ काणाडोळा करता आला असता. सुदैवाने, उशिरा का होई ना, जयरामांचे सध्याचे ‘साहेब’ डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ साली ती चूक दुरुस्त केली.

जयराम रमेश यांनी आपल्या या मसुदागायनात अश्या काही ताना मारल्या आहेत की त्यामुळे नागरी सामाजिक संघटनांचीही मने हरखून गेली असतील. जयराम रमेशांनी भूसंपादनग्रस्त शेतकऱ्यांसाठी नुकसानभरपाई व पुनर्वसनाचे जे गाठोडे पुढे केले आहे ते नर्मदेवरील सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या गाठोड्यापेक्षा फारसे वेगळे नाही. संपादित जमिनीच्या मुद्रांकशुल्काच्या आधारावर सुरुवातीची एकरकमी नुकसानभरपाई, पुनर्वसनाच्या जागी बिऱ्हाडबारदाना हलविण्याचा वाहतूक खर्च, प्रत्येक कुटुंबासाठी बांधलेले घर तसेच नवीन वसाहतीत शाळा, अंगणवाडी, दवाखाना, रस्ते, वीज, पिण्याचे पाणी, प्रार्थनास्थळे, स्मशानभूमी यासारख्या सोयीसुविधांचे निर्माण असे सर्व काही या गाठोड्यात आहे. त्याखेरीज, ज्या कंपनीसाठी भूसंपादन होणार त्या कंपनीचे शेअर्स, त्या कंपनीत कुटुंबातील एका सदस्यास नोकरी, नोकरी नको असेल तर त्याबदल्यात रोख २ लाख रुपये, संपादनानंतर १२ महिने प्रत्येक कुटुंबाला दरमहा ३००० रुपये निर्वाहभत्ता, २० वर्षे प्रत्येक कुटुंबाला दरमहा २००० रुपये वर्षासन - मग ते कुटुंब जमीनधारक असो का भूमिहीन; शिवाय, ज्यांची जमीन नागरीकरणासाठी संपादित होणार असेल त्यांना त्यांच्या संपादित जमिनीच्या २० टक्के विकसित जमीन असे प्रस्तावही मंत्रीमहोदयांनी या गाठोड्यात बांधले आहेत.


कुटुंब हा एक घटक मानून या फायद्यांचे वाटप होणार असल्याने भूसंपादनाची चाहूल लागताच मोठ्या प्रमाणावर जमिनीचे तुकडे तर होतीलच पण, कुटुंबांचेही विभक्तीकरण होऊन कुटुंबव्यवस्थाच मोडून पडेल. शिवाय, त्या फायद्यांवर दावा सांगणारे इतके कज्जे उभे राहतील की ते चालविण्याची सुरुवात करणेही सध्याच्या न्याययंत्रणेच्या आवाक्याबाहेर राहील.

नर्मदा बचाव आंदोलनात एका टप्प्यावर मेधा पाटकर पुनर्वसनाऐवजी ‘जमिनीच्या बदल्यात जमीन’ या सूत्राच्या मोहात पडल्या आणि तसा प्रस्ताव मांडून तो त्यांनी स्वीकारला. सुदैवाने, आपला हा मसुदा तयार करताना जयराम रमेशांनी ती चूक केली नाही. नर्मदा प्रकल्पाच्या विस्थपितांसाठी ‘जमिनीच्या बदल्यात जमीन’ या प्रस्तावाची अंमलबजावणी करताना नोकरशाहीने, सरकारच्या वतीने जमिनी खरेदी करताना आणि त्या लाभधारकांना वाटताना अश्या दोन्ही वेळा पैसा कमावण्याची संधी साधली. सुदैवाने, शेती हा घाट्याचा उद्योग आहे आणि बहुसंख्य शेतकरी काही करून शेती सोडण्यास उत्सुक आहेत याचे भान मंत्रीमहोदयांना आलेले दिसते त्यामुळे त्यांनी ‘जमिनीच्या बदल्यात जमीन’ हा प्रस्ताव घातला नसावा.

जयरामांच्या भूसंपुपु विधेयकाच्या या मसुद्यात देशाला सध्या भेडसावणाऱ्या ‘अन्नसुरक्षिततेच्या’ समस्येवर काहीच उपाययोजना नाही. वेगवेगळ्या निमित्तांनी आज भूसंपादन ज्या गतीने चालू आहे तसेच चालू राहिले आणि शेतीमालाला रास्त भाव मिळत नसतानासुद्धा शेतकरी अन्नधान्यउत्पादनाचे जे प्रयत्न करीत आहेत त्या प्रयत्नांत सरकार वीजपुरवठा तोडणे, कर्ज उपलब्ध न करणे, इंधनतेलाच्या किंमती वाढण्याला वाव देणे, जमिनीचे आणखी तुकडे पाडण्यास शेतकऱ्यांना मजबूर करतील अशी धोरणे आखणे असे अडथळे सरकार उभे करीत राहिले तर ‘अन्नसुरक्षितता’ साधण्याचा विचार शुद्ध मनोरथ ठरेल.

स्वातंत्र्यानंतर लगेच भारताने जपानचा कित्ता गिरवला असता आणि शेतकऱ्यांना आकृष्ट करील अशी किंमत शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतीमालाला देऊ केली असती तर औद्योगिक व संरचनात्मक विकास

**पान १३ पाहा**



## ७६व्या वाढदिवसाच्या निमित्ताने मा. शरद जोशींना अनावृत्त पत्र

# आदरणीय शरद जोशी

आदरणीय शरद जोशी

सविनय नमस्कार.

३ सप्टेंबर २०११. तुमचा ७६वा वाढदिवस.

अंतःकरणपूर्वक वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

नेहमीप्रमाणे या निमित्ताने शेतकरी संघटनेच्या व तुमच्या संबंधाने भूतकाळातील अनेक आठवणी जाग्या होतात. या वेळी या आठवणी उघडपणे तुमच्याशी आणि संघटनेच्या इतर पाईकांशी संवादाव्यात म्हणून या अनावृत पत्राचा प्रपंच.

अगदी सुरुवातीची आठवण आहे ती १९७८ सालातील. शेतकरी संघटनेच्या कार्याला त्या वेळी सुरुवातही झाली नव्हती. आंबेठाणला तुम्ही काही शेती घेतलेली होती. त्या निमित्ताने तुमचे चाकण भागात येणेजाणे सुरू होते. तुम्ही सिंध कॉलनी, औंध (पुणे) येथे त्या वेळी रहात होतात.

१९७८ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका त्या वेळी लागल्या होत्या. खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात जनता पक्षाने तिकिट नाकारल्याने लोकांच्या आग्रहास्तव चाकणचे गांधीवादी सामाजिक कार्यकर्ते मामा शिंदे अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत होते. त्यांच्या प्रचारयंत्रणेत माझाही सहभाग होता. चाकण निवडणूक कार्यालयातील काही कामे माझ्याकडे असत. काही वेळा प्रचाराच्या गाडीतही मी जात असे. चाकणचेच शंकरराव वाघ, गोपाळ जगनाडे, बाबुलाल परदेशी, वनारसे सर या ग्रुपमध्ये मीही काही दिवस फिरलो.

आमच्यासाठी जी गाडीची सोय करण्यात आली होती ती तुमची स्वतःची होती. सकाळी ठरल्यावेळी तुम्ही डिझेल भरून गाडी स्वतः चालवीत कार्यालयाजवळ हजर व्हायचे. एक एक करून सर्वजण जमा व्हायचे आणि गाडी प्रचाराला निघायची. एकदोन वेळा अश्या फेऱ्या झाल्यावर मी स्वतःच तुमच्या विषयीची माहिती घेतली. या निवडणुकीच्या वेळी ज्या ज्या दिवशी मी प्रचाराच्या निमित्ताने प्रवास केला त्या त्या वेळी एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली. आम्ही ज्या गावात जात असू तिथे लोकांच्या गाठीभेटी, निवडणूक प्रचारसभा याच्यात तुमचा काहीही सहभाग तिथे नसायचा. या कामाचा आमचा तिथला कार्यभाग उरकेपर्यंत तुम्ही इतरत्र फिरत असताना किंवा गाडीजवळ उभे असताना भेटणाऱ्या ग्रामस्थांशी तुमचा संवाद चाललेला असायचा. विषय काय असायचे हे तुम्हालाच माहिती. निवडणुकीचे उमेदवार मामा शिंदे हे आमचे आदर्श. राजकारणातले तसे दैवतच. त्यामुळे, त्यांच्या प्रचाराच्या वेळी इतर काही व्यापारात माझ्यासारख्या तशा तरुण कार्यकर्त्याला काहीच देणेघेणे नव्हते. त्यामुळे आम्ही तुमच्यापासून आणि तुम्ही आमच्यापासून फटकूनच होतो. जी काही माहिती तुमच्या विषयीची मिळालेली होती त्यातून एक आदरयुक्त स्नेहभाव तयार झाला होता इतकेच.

निवडणुकीची धामधूम संपली. आम्ही निवडणूक हरलो. प्रत्येकजण आपापल्या कामात जुंपला गेला. मी नोकरीत असल्याने बदलीमुळे जेजुरीला निघून गेलो आणि वैयक्तिक तुमचा माझा संबंध दुरावला. गावी यायचो त्या वेळी इतरांकडून तुमच्या विषयीची मिळेल ती माहिती घ्यायचो इतकेच.

अशी माहिती घेत असताना माझ्या लक्षात आले की, त्या वेळच्या विधानसभा निवडणुकीत तुम्हाला फारसा रस नव्हता. परंतु, त्या निमित्ताने त्या परिसरातील गावे, शेतीची परिस्थिती, तेथील लोकांचे विचार या बाबींचा तुमचा अभ्यास चालू होता. कोरडवाहू शेतीच्या प्रश्नासंबंधाने तुमचे जे अर्थशास्त्रीय चिंतन चालू होते त्याचाच तो भाग होता. या

निवडणुकीत एक गोष्ट चांगली झाली ती अशी की, या वेळी जे लोक तुमच्या संपर्कात आले त्यातले बरेचसे कायमचे शेतकरी संघटनेच्या कार्यात सहकारी राहिले. प्रत्यक्ष या निवडणुकीतील उमेदवार मामा शिंदे पहिल्या कांदा आंदोलनातले पहिले सत्यग्रही म्हणून सहभागी राहिले. या निवडणुकीच्या वेळी आणि त्यानंतर तुम्ही या मावळ खोऱ्यातला जो खडतर प्रवास केला, जो अभ्यास केला त्यातूनच शेतीच्या प्रश्नांसंबंधी काही मूलभूत प्रमेयांचा उलगडा झाला. काही महत्त्वाचे सिद्धांत मांडले गेले. त्या वेळी अत्यंत प्रामाणिकपणे व निश्चित विचाराने आपली मांडणी सुरू होती. भारतीय शेतकऱ्याच्या दारिद्र्याचा महत्त्वाचा प्रश्न सोडविण्यासाठी काही निश्चित मार्गाचा शोध आपण घेत होतात. आणि म्हणूनच सुरुवातीच्या आंदोलनकाळात 'मी राजकारण करणार नाही, राजकारणात उतरलो तर मला जोड्याने मारा' असे उद्गार तुमच्याकडून जाहीरपणे काढले गेले. या आपल्या उद्गारांचा नंतर अनेक लबाडांनी आणि संधिसाधूंनी स्वार्थासाठी उपयोग करून घेतला. परंतु, संघटना बांधणीच्या सुरुवातीच्या काळात तुम्ही जो कठीण संघर्ष केला आहे, तो ज्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिला त्यांना तुमच्या त्या उद्गारातील प्रामाणिकपणाबद्दल आजही आदर वाटतो आहे.

सर, ('साहेब' असे तुमच्यासाठी वापरण्याचे मी जाणीवपूर्वक टाळतो आहे.) कोणती ऊर्जा या कार्यासाठी तुम्हाला प्रवृत्त करीत होती याचा आजही मी विचार करतो आहे. ज्या समाजाला संघटित करायचे आहे त्याला वाचनाची आवड नाही, त्यांच्या अंगी प्रयोगशीलता नाही; आपल्या व्यवसायच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाची दिशा नाही, हिशोबाशी काही देणेघेणे नाही त्या समाजाला अर्थशास्त्र शिकवायचे होते. त्यांना समजेल अश्या भाषेत बोलण्यासाठी तुम्हाला तयारी करावी लागली आहे. अनेक गावांत पोहोचण्यासाठी केवळ पायी मार्गांचाच अवलंब करावा लागला आहे. स्वतःच्या घराची घडी उद्ध्वस्त होताना दिसत असूनही त्याकडे दुर्लक्ष करावे लागले आहे. या सर्वांवर तुम्ही मात केलीत हे आम्ही पाहिले आहे, अनुभवले आहे.

या देशातल्या शेतकऱ्याच्या वाट्याला आलेले दारिद्र्य हाच खरा इथला प्रश्न असल्याचा तुमचा निष्कर्ष आजही तितकाच खरा आहे. अनेक मार्गांनी हा प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी तुम्ही प्रयत्नशील राहिलात. अशक्यप्राय वाटलेले शेतकऱ्यांचे संघटन या कामी तुम्ही उभे केले. स्वतःच्या शरीरावर व मनावर होणाऱ्या विपरीत परिणामांचा यत्किंचितही विचार न करता तुम्ही झिजत राहिलात. 'शेतकरी संघटक'च्या सुरुवातीच्या अंकात तुम्ही शेतीमालाचा उत्पादनखर्च कसा काढावयाचा या पहिल्या धड्यापासून सुरुवात करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील घडामोडींचा परिणाम कसा राहील इथपर्यंतचे सर्व विषय शेतकऱ्याला शिकविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आला आहात. या सर्व चिंतनातून निघालेल्या 'शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव मिळाला पाहिजे' आणि 'भीक नको, घेऊ घामाचे दाम' या दोन सिद्धांतांवर काम करायला आजही कोणी तयार नाही. शेतकऱ्याच्या दुखण्याचे मूळ असणाऱ्या या दोन गोष्टी सोडून चुकीच्या मलमपट्ट्यांनी ही जखम अधिकच चिघळविण्याचे प्रयत्न अनेक अंगांनी सुरूच आहेत.

तुम्ही मांडलेले सिद्धांत शेतकऱ्याला समजावण्यात तुम्ही मोठ्या प्रमाणात यशस्वीही झालात; मोठे संघटन त्या कामी उभे राहिले. छातीवर गोळ्या झेलण्यासाठी शेतकरी तयार झाला. लाखोंच्या संख्येने शेतकरी भाऊबहिणी आंदोलनात उतरल्या आणि तुरुंगात जाण्यासाठी तयार झाले. तुम्ही केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांची पावती म्हणून तुम्हाला 'महामानव' आणि 'शेतकऱ्यांचे पंचप्राण' यासारख्या बिरुदावली त्यांनीच उत्स्फूर्तपणे समर्पित केल्या आहेत. आज जीवनाच्या अखेरच्या पर्वात, शरीर विकलांग झालेले असतानाही 'कर्जमुक्त शेतकरी' हे आपले स्वप्न असल्याचे आणि त्यासाठी प्रतिज्ञाबद्ध असल्याचे तुमचे उद्गार शेतकऱ्यांना प्रेरणादायी ठरणारे आणि कार्यप्रवृत्त करणारे आहेत असे निश्चितपणे वाटते.

सर, तुम्हाला कितपत पटेल, किंबहुना इतरांना किती रुचेल माहीत नाही, परंतु तुम्ही केलेल्या वाटचालीकडे पहाताना शतकापूर्वी महामानव विवेकानंद यांच्या जीवनात घडलेल्या घटनांची पुनरावृत्ती होताना मला दिसते आहे.

आपले सद्गुरु श्री रामकृष्ण परमहंस यांच्या महानिर्वाणानंतर, सर्व गुरुबंधूंनी एकेकट्याने भारतभ्रमण करावे असे विवेकानंद यांनी सुचविले. त्याप्रमाणे स्वतः विवेकानंदांनी तीन वर्षांहून अधिक काळ सन्यस्त वृत्तीने संपूर्ण भारतात भ्रमंती केली. आध्यात्मिक साधना, वेगवेगळ्या धर्मपंथांचा अभ्यास, देश-काळ परिस्थिती, सांस्कृतिक दर्शन अश्या अनुभूती घेण्याचा त्यामागे मुख्य उद्देश होता. त्याबरोबर सामाजिक जाणिवेचे भान ठेवून स्वामीजींनी या भ्रमंतीत चिंतन केले आहे. या प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात स्वामींनी कन्याकुमारीच्या समुद्रातील शिलाखंडावर तीन रात्री आणि तीन दिवस ध्यानस्थ राहून चिंतन केले. 'शतकानुशतके सर्वसामान्य माणसाकडे दुर्लक्ष होत आले आहे हे भारताच्या अवनतीचे प्रमुख कारण आहे', 'दारिद्र्य हा भारताचा खरा प्रश्न आहे' आणि 'यानंतरचे आपले सारे आयुष्य भारतातील दीनदलितांच्या सेवेसाठी व्यतित करावयाचे' अशा निष्कर्षांप्रत पोहोचल्याचे त्यांनी म्हटले आहे. या वेळी स्वामी विवेकानंद यांचे वय तीस वर्षांचे होते. त्यानंतर शिकागो परिषद, श्री रामकृष्ण मठाची स्थापना, पाश्चिमात्य जगातील प्रवास असा जीवनपट आहे. आणि वयाची चाळीस वर्षे पूर्ण करण्याच्या अगोदरच त्यांचे महानिर्वाण झाले आहे. 'पंधरा शे वर्षे पुरतील एवढे विचारधन आपण जगाला देऊन ठेवले आहे' असे आत्मविश्वासपूर्वक उद्गार त्यांनी स्वतःच काढले आहेत.

विवेकानंदांचे जीवनचरित्र हा खूप मोठा आणि सखोल विषय आहे. आणि माझ्या दृष्टीने शेतकरी संघटना, शेतकरी आंदोलन आणि समाजाची बधिरता कधी संपणार हे सांगणारा संघटना विचार सर्वांगीण अभ्यासाचा विषय आहे. या पत्राचा शेवट करताना, आम्हा सगळ्यांच्या चिंतनासाठी विवेकानंदांच्या तीन उद्गारांचा उल्लेख करू इच्छितो.

स्वामी विवेकानंद म्हणतातः

'दोन खरेखुरे जीवाभावाचे सहकारी मागे ठेवून जाता येणे ही गोष्ट एखाद्या श्रेष्ठ पुरुषाच्या महत्त्वाकांक्षेच्याही पलीकडे पोहोचणारी आहे.'

'जर दुसरा कोणी विवेकानंद असता तर तोच या विवेकानंदाने या जगात येऊन काय केले आहे हे समजू शकला असता.'

'मोठ्या झाडाच्या छायेत छोटी झाडे वाढू शकत नाहीत, इतरांना वाव करून देण्यासाठी मला बाजूला होणे भाग आहे.'

वाढदिवसाच्या पुनश्च हार्दिक शुभेच्छा.

**श्याम पवार**

महाळुंगे इंगळे (४१०५०१) भ्रमणध्वनीः ९८६०८९२९६७

■■


# पेटलेले पाणी स्फोटक धरणी

**सध्या राष्ट्रीय जमीन अधिग्रहण व पूनर्वसन विधेयक २०११ यावर विचार विनिमय चालू असून याच कालावधीत शेतकऱ्यांवरती गोळीबाराच्या दोन घटना घडल्या आहेत. त्यातील वरील घटना तर ताजीच आहे. या अगोदर काही दिवसांपूर्वीच जैतापूर येथे विरोधी पक्षांनी जैतापूर अणू प्रकल्पाला विरोध करण्यासाठी पुकारलेल्या बंदवर पोलिसांनी केलेल्या बेछूट गोळीबारात तीन शेतकरी मृत्यूमुखी पडले.**

पिंपरी-चिंचवडला बंदिस्त जलवाहिनीतून पाणीपुरवठा करण्याच्या योजनेला विरोध करण्यासाठी मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी क्रांतिदिनी ९ ऑगस्ट रोजी पुकारलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीन शेतकरी मृत्यूमुखी पडले. त्यात दोन पुरुष व एका महिलेचा समावेश आहे. पवना नदीतून पिंपरी चिंचवडला पाणी-पुरवठा करण्यासाठी ही ७० किलोमीटर लांबीची बंदिस्त जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. आंदोलन व गोळीबाराच्या घटनेमुळे सध्या या प्रकल्पाला स्थगिती देण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवडच्या वाढत्या लोकसंख्येला मुबलक पाणी मिळावे या हेतूने ही योजना आखण्यात आली आहे. पवना धरण ते रावेत जलउपसा केंद्र या ७० कि.मी. मार्गावर बंद जलवाहिनी टाकण्यात येणार असून २३४ कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्राकडे सादर करण्यात आला आहे. प्रस्ताव मंजूर होऊन ११७ कोटींचे अनुदान मिळाले आहे व ७० पैकी ९ कि.मी.ची जलवाहिनीही टाकून झाली आहे. एकूण खर्चापैकी १६४ कोटींचा खर्च महापालिका करणार आहे. अगोदरच झालेल्या दिरंगाईमुळे खर्च ३९८ कोटींवर गेला आहे.

या योजनेला विरोध करण्याची प्रमुख कारणे म्हणजे ५० गावांतील १०० एकर क्षेत्र बाधीत होणार आहे. पवना धरणात एकूण १०.५ टीएमसी पाणी साठा असून त्यातील ६.५ टीएमसी पाणी या योजनेद्वारे उचलले जाणार आहे. त्यामुळे निम्म्याहून अधिक पाणी पिंपरी-चिंचवडला मिळाल्यामुळे मावळ तालुक्यातील शेतीला अर्धाच पाणी पुरवठा होणार असून मावळ तहानेले राहणार आहे. पवनेतून रोज ४५० क्युसेक पाण्याद्वारे होणारी १० मेगावॅट वीज निर्मिती घटणार आहे. सर्व विरोधी पक्षांनी शिवसेना, भाजप, भाकप, माकप, मनसे यांनी ९ ऑगस्ट रोजी पुकारलेल्या बंदला हिंसक वळण लागले आणि त्यानंतरच या लढाईची सुरुवात झाली. याच काळात विधानसभेचे अधिवेशन चालू असल्यामुळे या गोळीबाराचे पडसाद ताबडतोब विधानसभेत उठले आणि विरोधकांनी सरकारला धारेवर धरले.



ज्ञानेश्वर शेलार

गोळीबाराच्या घटनेनंतर पोलिसांनी नागरिकांना दमदाटी केल्याच्या तक्रारी आल्या आहेत. पोलिसांविरुद्ध तक्रार नोंदवू नये यासाठी पोलिस दमदाटी करत असल्याचे समजते. घटनेचे पडसाद पुण्यातही उमटले. भाजपच्या कार्यकर्त्यांनी पुण्यात सरकारविरोधी घोषणा दिल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घटनास्थळी भेट दिली. ते ९ वाजता भेटीसाठी जाणार होते; परंतु लोकांचा रोष बघितल्यावर त्यांनी एक तास अगोदरच भेट दिली आणि निघून गेले. तसेच मुख्यमंत्र्यांनीही मावळला भेट दिली असून ते पोलिसांची पाठराखण करीत आहेत, असा ठपका त्यांच्यावर आंदोलकांनी ठेवला आहे. आंदोलन आटोक्यात आणण्यासाठी पोलिस प्रयत्न करीत असताना आंदोलकांनी उग्र रूप धारण केल्याने नाईलाजास्तव पोलिसांना गोळीबार करावा लागला, असे सरकारचे म्हणणे आहे. विरोधकांनी मात्र शांततामय मार्गाने आंदोलन चालू असताना पोलिसांनी लोकांना पांगवण्यासाठी लाठीचार्ज सुरू केला. लोकांची पळापळ सुरू झाल्यानंतर पाठीमागून गोळ्या झाडल्या. एका शेतकऱ्याला तर टाटा सुमोतून पकडून नेत असताना त्याला गाडीत गोळ्या झाडण्यात आल्याचे विरोधी पक्षाचे म्हणणे आहे. पुराव्यादाखल त्यांनी विविध वाहिन्यांवरती दाखविण्यात आलेल्या दृष्यांचा दाखलाही दिला आहे. हा धागा पकडूनच विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी पोलिसांनी शेतकऱ्यांचे एन्काऊंटर केले व त्यांच्यावर ३०२चे कलम लावावे असे म्हटले आहे. गृहमंत्री आर.आर. पाटी यांनी चौकशीत असे काही निष्पन्न झाल्यावर पोलिसांवर निश्चितच ३०२चे कलम लावण्यात येईल असे सांगितले. विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी

घटनेची न्यायालयीन चौकशी करावी, बंद पाइपलाइनमधून पाणी पुरवठा केल्यास शेतीला पाणी मिळणार नाही अशी स्थानिकांची भावना असल्याचे सांगितले. या योजनेचा ६५ गावांना फटका बसणार आहे. १९७१ मध्ये हे धरण बांधले तेव्हा १९ गावांतील लोक विस्थापित झाले व त्यांचे अजूनही पुनर्वसन झालेले नाही. यातच खरे अशांततेचे बीज आहे. पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठा करण्याऐवजी नदीतूनच पाणीपुरवठा केल्यास शेतीलाही पाणी मिळेल व शेतकरी बाधीत होणार नाही, असेही म्हटले जाते.

या घटनेवर सत्ताधारी आणि विरोधकांचे राजकारण चालूच आहे. एवढेच नव्हे तर सत्ताधाऱ्यांतील एक गट आणि विरोधकांचे त्याला सहकार्य असे चित्रही समोर आले आहे. विरोधक गोळीबाराच्या घटनेसंदर्भात गृहमंत्र्यांना टार्गेट करण्याएवेजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना टार्गेट करीत आहेत. गृहमंत्र्यांचे भाषण विधानसभेत सुरळीत होते; परंतु दादा उभे राहिले की गोंधळ सुरू होतो असे चित्र दिसते. पुणे आणि परिसरात लवासा, ॲम्बीव्हॅली, सहारा सिटी अशा पंचतारांकीत वसाहती उभ्या राहिल्या त्यासाठी घेण्यात आलेल्या जमिनी या वरवर कायदेशीर दिसत असल्या तरी मध्यस्थांमार्फत शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान आहे, असा सर्वांचा समज झालेला आहे. गृहमंत्री, महसूल मंत्री हे यामध्ये फारसे फोकसमध्ये येत नाहीत. पवार कुटुंबियांचे नाव मात्र कोठे ना कोठे सतत जोडले जाते. त्याचाच हा परिणाम आहे. मातीमोल भावाने घेतलेल्या जमिनींचा भाव चार-आठ दिवसांत फार तर एखाद्या महिन्यात लाखावरून कोटींवर जातो. हे त्यातील मोठे व्यवहार कौशल्य आहे.

सध्या राष्ट्रीय जमीन अधिग्रहण व पूनर्वसन विधेयक २०११ यावर विचार विनिमय चालू असून याच कालावधीत शेतकऱ्यांवरती गोळीबाराच्या दोन घटना घडल्या आहेत. त्यातील वरील घटना तर ताजीच आहे. या अगोदर काही दिवसांपूर्वीच जैतापूर येथे विरोधी पक्षांनी जैतापूर अणू प्रकल्पाला विरोध करण्यासाठी पुकारलेल्या बंदवर पोलिसांनी केलेल्या बेछूट गोळीबारात तीन शेतकरी मृत्यूमुखी पडले.

उत्तर प्रदेशमध्ये आग्रा ते नोएडा या राष्ट्रीय महामार्गासाठी भट्टा-परसौल येथे जमीन अधिग्रहणाला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांनी उग्र आंदोलन केले. त्यातही तीन शेतकरी मृत्यूमुखी पडले. सध्या उत्तर प्रदेशमध्ये मायावतींचे सरकार असल्याने येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये उत्तर प्रदेश, काँग्रेसच्या पंज्याखाली यावा यासाठी युवराज राहूल गांधी यांनी भट्टा-परसौलच्या आंदोलनात उडी घेतली. पदयात्रा काढणे, मोटर सायकलवर आंदोलनात सामील होणे, एवढेच नव्हे तर तेथे पोलिसांच्या अत्याचाराला महिला बळी पडल्या आहेत, असा कांगावा करून पंतप्रधानांपर्यंत गाऱ्हाणे मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच पक्षाच्या सरकारने उत्तर प्रदेशच्या या घटनेच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीने असे काहीही घडलेले नसून गोळीबाराची घटना झाल्याचे सांगितले. महिलांवर अत्याचाराची घटना घडलेली नाही, असे निष्पन्न झाले आणि युवराज तोंडावर पडले.

जैतापूर येथेही त्यांचेच सरकार असल्यामुळे युवराजांनी साधी भेटही दिली नाही किंवा कुठे उल्लेखही केला नाही. सध्या तर मावळचे आंदोलन आणि जमीन अधिग्रहण कायद्यातील सुधारणा या महत्त्वाच्या घटना घडत असताना युवराजांचा कुठेही पत्ता नाही. त्यांना खरोखरच शेतकऱ्यांचा कळवळा असता तर त्यांनी या दोन ठिकाणी भेट दिली असती. एवढेच नव्हे तर अशा घटना घडू नये, यासाठी कायद्यातील तरतुदी अधिक चांगल्या करण्यासाठी तोंड उघडले असते; पण असे घडलेले नाही. आपल्याच पूर्वजांनी पुढे चालवलेला १८९४चा जमीन अधिग्रहण कायदा बदलावा किंवा त्यात सुधारणा कराव्यात असे ते अद्यपी म्हणत नाहीत.

मावळच्या घटनेच्या संदर्भात प्रतिक्रिया देताना गोपीनाथ मुंडे यांनी पोलिसांवर खुनाचे गुन्हे लावावेत, असे म्हटले आहे. कायद्यात बदलाविषयी त्यांचे सरकार असताना आणि कायद्याच्या बदलाची प्रक्रिया चालू असताना त्यांनीही काहीही म्हटलेले नाही. नुकतेच शिवसेनेला येऊन मिळालेले रामदास आठवले यांनी नेहमीसारखीच या घटनेची सीबीआय चौकशी करावी अशी मागणी केली आहे. तेही अशा वारंवार घडणाऱ्या घटनांबद्दल केवळ पोलिसांना दोषी धरणे किंवा सीबीआय चौकशी करणे येथेच थांबतात, ब्रिटीशकालीन कायदे बदलण्याबाबत काहीही म्हणत नाहीत. दलितांना संपत्तीचा व साधनांचा अधिकार मिळावा यासाठी दलित संघटना, पक्ष व पुढारी हे जमिनीच्या फेरवाटपाची गायरान जमीन व इतर सरकारी जमीन, दलितांना उत्पन्नाचे साधन म्हणून मिळाव्यात यासाठी आग्रह धरतात. शेती तोट्याची असताना तीच दलितांना मिळावी. म्हणजे खाटी गाय दान देण्यासारखे हे कृत्य आहे. तरी त्यासाठी कित्येक वर्षांपासून लढा देण्यात येतो. कायद्यातील बदलांविषयी मात्र ज्यांनी पाच-दहा वर्षे मुंबईत किंवा दिल्लीत लोकप्रतिनिधी म्हणून घालविली ते शब्दही बोलायला तयार नाहीत.

प्रस्तावित जमीन अधिग्रहण व पुनर्वसन कायद्यातील काही गोष्टींचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. नवीन येणारा कायदा हा संपूर्णपणे वेगळा नसून १८९४च्या जमीन अधिग्रहण कायद्यातील सुधारणा आहेत. १८९४ चा कायदा अस्तित्वात राहणार आहे. शेतकऱ्यांना आपले म्हणणे कोठेही मांडता येऊ नये, यासाठी इंदिरा गांधींच्या काळात घटनेच्या नवव्या शेड्युलमध्ये ज्या २८० तरतूदी टाकण्यात आल्या त्यांपैकी अडीचशे तरतूदी या जमीन अधिग्रहणविषयक कायद्यांच्या आहेत. त्यामध्ये काहीही बदल करण्यात आलेला नाही. याचाच अर्थ घटनेच्या नवव्या शेड्युलला नवीन कायद्यातही टाकण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांचे मालमत्तेचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याची ही तरतूद जशीच्या तशी राहणार आहे.

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नावाने ओरड करीत असतानाच छोट्या शेतकऱ्यांना आपला शेतीचा तुकडा समभागामध्ये बदलून त्या बदल्यात मोठ्या कंपन्यांमध्ये सहभागी होता येण्याची कोठलीही तरतूद नवीन कायद्यात नाही. केवळ पुनर्वसनाच्या कामाची कालमर्यादा व अधिग्रहीत होणाऱ्या जमिनीची सरकारी किमतीपेक्षा अधिकातअधिक सहापट किंमत मिळू शकेल, अशी तरतूद आहे. मोठ्या शहरांच्या भोवती आजही जमिनीची किंमत अत्यंत नगण्य आहे. प्रत्यक्ष बाजारभावामध्ये ही किंमत पस्तीस ते पन्नास पट आहे. अशा ठिकाणी जमीन अधिग्रहणाचा प्रश्न उपस्थित झाल्यावर पुन्हा शेतकऱ्यांचा उद्रेक होणार नाही याची काहीही शाश्वती नाही. कदाचित मावळपेक्षाही उग्र घटना घडू शकतील.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# नवे भूसंपादन विधेयक आहे तरी काय?


**सन १८९४ च्या भूसंपादन कायद्यांच्या तुलनेत नवे भूसंपादन विधेयकामध्ये विस्थापितांना बऱ्याच प्रमाणात न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यात काही त्रुटी असल्या तरी त्यामुळे सामाजिक संघटनांनी सदरील विधेयकास सरसकट विरोध न करता त्यात योग्य त्या दुरुस्त्या सूचवून हे विधेयक लवकरात लवकर अस्तित्वात यावे म्हणून प्रयत्न करावेत.**

शेतकऱ्यांची जमीन सार्वजनिक हिताच्या नावाखाली संपादीत करता यावी म्हणून इंग्रजांनी जमीन-भूसंपादन कायदा इ.स. १८९४ मध्ये तयार केला. भारताच्या स्वातंत्र्याला आज जवळपास ६४ वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्यात ६४ वर्षांमध्ये सदर कायद्यात काही किरकोळ दुरुस्त्या सोडल्यास कोणत्याही प्रकारच्या बदल करण्यात आलेला नाही. इंग्रज हे परकीय होते म्हणून त्यांनी स्वहितासाठी शेतकऱ्यांची जमीन हिसकावून घेण्यासाठी कायदा केला, हे आपण समजू शकतो; परंतु इंग्रज गेल्यानंतर आपल्या देशातील राज्यकर्त्यांनी राजकीय स्वार्थापोटी सदरचा कायदा जसाच्या तसा ठेवला.

इंग्रजांनी भूसंपादन कायदा १८९४ मध्ये तयार केला तेव्हा भारताची राज्यघटना अस्तित्वात नव्हती. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना अस्तित्वात आली तेव्हा सदर घटनेचे कलम १९ फ प्रमाणे मालमत्ता धारण करण्याचा अधिकार हा मूलभूत हक्कांत समाविष्ट करण्यात आला होता; परंतु सदरचे कलम त्यावेळेच्या पंतप्रधान इंदिरा गांधींच्या काळात दि. २०/६/१९७९ रोजी ४४वी घटना दुरुस्ती करून वगळण्यात आले.

दि. २०/६/१९७९ च्या ४४ व्या घटना दुरुस्तीपूर्वी मालमत्ता धारण करण्याचा अधिकार हा मूलभूत हक्कांत समाविष्ट असल्यामुळे सरकारला देशातील कोणत्याही नागरिकाची स्थावर व जंगम मालमत्ता त्याच्या इच्छेशिवाय घेता येत नव्हती, त्यामुळे १८९४चा इंग्रजांचा भूसंपादन कायदा अस्तित्वात असूनही काहीएक कामाचा नव्हता. सदरच्या घटनादुरुस्तीमुळे सरकारला इंग्रजांप्रमाणे १८९४च्या भूसंपादन कायद्याचा आधार घेऊन सार्वजनिक हिताच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध मनमानी करून शेतकऱ्यांची जमीन हिसकावून घेण्याचा अधिकृत परवानाच मिळाला आहे. सदर कायद्याचा आधार घेऊन आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांना विस्थापित करून या देशातील उद्योगपती व कारखानदारांच्या घशात शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने घालण्यात सरकार यशस्वी ठरले. इ.स.१९८० पर्यंत आपल्या देशामध्ये शेतकऱ्यांची संघटना नव्हती. ज्या काही थोड्याफार संघटना होत्या त्या त्या भागापुरत्या मर्यादित होत्या. शेतकरी संघटनेचे नेते मा. शरद जोशी यांनी सर्वप्रथम मागणी केली, की १९७९ मध्ये केलेली ४४ वी घटना दुरुस्ती रद्द करण्यात यावी व शेतकऱ्यांच्या जमीन धारण करण्याचा अधिकार हा मूळ घटनेप्रमाणे मूलभूत हक्कांत समाविष्ट करण्यात यावा. तसेच भारतीय घटनेचे परिशिष्ट ९ रद्द करण्यात यावे.

सन १९८० नंतर अन्यायकारक भू-संपादनाला शेतकऱ्यांकडून संघटित विरोध होण्यास सुरुवात झाली व त्याचा सर्वांत पहिला मोठा फटका सिंगूरच्या प्रकरणामध्ये टाटा उद्योगसमुहाला बसला. तसेच ग्रेटर नोएडामध्ये शेतकऱ्यांनी आंदोलने करून तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन ग्रेटर नोएडा ॲथॉरिटीने बेकायदेशीररीत्या संपादित करून बिल्डरांच्या घशात घातलेल्या जमिनी परत मिळविण्यात यश मिळवले. त्यामुळे सरकारला जाग आली व नवीन भूसंपादन विधेयक तयार करणे भाग पडले.



ॲड. प्रकाशसिंह पाटील

## नवीन भूसंपादन विधेयकातील तरतूदी :

१) नागरी भागात संपादीत जमिनीसाठी मालकास दुप्पट, तर ग्रामीण भागात सहापट भरपाई मिळणार.
२) भू-संपादन अधिक पारदर्शक होईल व जमीन गमावलेल्यांना योग्य भरपाई मिळून त्यांचे योग्य पुनर्वसन होईल.
३) भू-संपादनामध्ये ग्रामसभेचा विचार होणार.
४) कोणत्याही परिस्थितीत शेतजमिनीचे भूसंपादन होणार नाही व खासगी उद्योगांसाठी सरकार भूसंपादन करणार नाही.
५) खासगी उद्योगांच्या रस्ते बांधणी अथवा अन्य सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांसाठी सरकार भूसंपादन करील; मात्र त्यासाठी ८० टक्के विस्थापितांची मान्यता अनिवार्य.
६) एकदा ज्या कारणासाठी भूसंपादन केले, ते कारण नंतर बदलता येणार नाही.
७) अनेक पिके काढली जाणारी व ओलिताखालील शेतजमीन संपादीत करता येणार नाही.
८) राष्ट्रीय आपत्ती अथवा संरक्षणविषयक मोर्चेबांधणीसाठी तातडीने भूसंपादन करण्याचा अधिकार सरकारकडे एकवटणार.
९) नव्या कायद्याच्या मसुद्यात भरपाई आणि पुनर्वसन यांचा थेट अंतर्भाव.
१०) उत्पन्नाचे साधन गेलेल्यांना वर्षभर दरमहा ३ हजार रुपये निर्वाह भत्ता व २० वर्षांपर्यंत दरमहा २ हजार रुपये सानुग्रह अनुदान.
११) एका व्यक्तीला नोकरी अथवा ती देता न आल्यास दोन लाख रुपये व इतर प्रोत्साहन भत्ते.
१२) पाटबंधारे प्रकल्पांसाठी जमीन अधिगृहीत केल्यास संबंधीत कुटुंबाला प्रकल्पग्रस्त मोक्याच्या जागी १ एकर जमीन.
१३) नागरीकरणासाठी जमीन घेतल्यास अधिगृहीत जमिनीपैकी २०% विकसीत जमिनीचा वाटा जमीनमालकाला द्यावा लागणार.
१४) भूसंपादनामध्ये राहते घर गेल्यास ग्रामीण भागातील बाधितांना १५० वर्ग मीटरचे, शहरी भागातील बाधितांना ५० वर्ग मीटरचे पक्के घर व एकरकमी ५० रुपये मिळणार.
१५) शंभर किंवा अधिक भटक्या विमुक्त कुटुंबांना विस्थापित व्हावे लागल्यास आदिवासी विकास आराखडा लागू केला जाणार.
१६) पुनर्वसन केलेल्या भागात शाळा, मैदान, आरोग्य केंद्र, रस्ते आणि वीज, प्रत्येक कुटुंबाला पिण्याचे पाणी अशा किमान २५ सुविधा दिल्या जाणार.
१७) संपादीत केलेल्या जमिनीचा पाच वर्षे वापर न केल्यास ती मूळ मालकाला परत करणार.

सदर तरतुदींप्रमाणे ग्रामीण व शहरी असा भेदभाव न करता दोन्ही जमीन मालकांना सारखी म्हणजे ६ पट नुकसान भरपाई मिळावयास पाहिजे.

सदरची जमीन संपादीत केल्यानंतर विस्थापितांना दरमहा ३००० रुपये निर्वाह भत्ता व २० वर्षांपर्यंत दरमहा २००० रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. सदरची रक्कम आजच्या महागाई निर्देशांकाशी तुलना करता अत्यंत तुटपुंजी असून भविष्यात तिच्यात कोणत्याही प्रकारची वाढ सुचवण्यात आलेली नाही. तसेच शहरी व ग्रामीण भागातील विस्थापितांमध्ये फरक न करता भूसंपादनामध्ये घर गेल्यास दोन्ही भागातील विस्थापितांना १५० वर्ग मीटरचे पक्के घर बांधून देण्यात यावे व गैरसोयीपोटी व पुनर्वसनासाठी २ लाख रुपये देण्यात यावेत.


सन १८९४ च्या भूसंपादन कायद्यांच्या तुलनेत नवे भूसंपादन विधेयकामध्ये विस्थापितांना बऱ्याच प्रमाणात न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यात काही त्रुटी असल्या तरी त्यामुळे सामाजिक संघटनांनी सदरील विधेयकास सरसकट विरोध न करता त्यात योग्य त्या दुरुस्त्या सूचवून हे विधेयक लवकरात लवकर अस्तित्वात यावे म्हणून प्रयत्न करावेत.

ॲड. प्रकाशसिंह बी. पाटील
(औरंगाबाद उच्च न्यायालय)
मधुबन अपार्टमेंट, ए-९, प्लॉट ३५९,
एन-३, सिडको, औरंगाबाद.
मो. ९८२२३६८९५४

# शक्तीमान लोकपाल नको, सक्षम पंतप्रधान हवा !

**[ अण्णा हजारे यांचा दुराग्रह मान्य केला तर लोकपाल यंत्रणेवर वर्षाकाठी देशाला ७५,००० ते ८०,००० कोटींचा खर्च येईल! जसजसे सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढेल त्या प्रमाणात हा खर्चही प्रत्येक वर्षी वाढता राहील. आजची नोकरशाही पोसण्यासाठी देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना व कष्टकऱ्यांना दारिद्र्याचे चटके सहन करावे लागत आहेत, लोकपालच्या नोकरशाहीने त्यांच्या दु:खात अधिक भर पडणार आहे. ]**

लेखाचे शीर्षक वाचूनच अनेक वाचकांचा राग अनावार झाला असेल. लेख वाचण्याआधीच प्रस्तूत लेखक सरकारातील भ्रष्टाचारी लोकांचा दलाल असल्याचा निष्कर्ष काढून ते मोकळ झाले असतील. त्यांना लेखकावर काँग्रेसचा शिक्का मारता आला असता तर अधिक आनंद झाला असता; पण शीर्षकातील पंतप्रधान बदलाच्या सूचक मागणीने त्यांना हा आनंद घेता येणार नाही. आज देशात जे वातावरण निर्माण झाले आहे किंवा निर्माण करण्यात आले आहे त्यातून वाचकांची अशी प्रतिक्रिया होणे स्वाभाविक आहे. देशभरात बातमी घडविणाऱ्यांपासून बातमी वाचणाऱ्यांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून त्यांच्या गुरुंपर्यंत, चाकरमान्या नोकरदारापासून उद्योजकापर्यंत, विचारवंतांपासून स्वयंसेवी समाजकारणी आणि राजकारणी लोकांपर्यंत सर्वांना गेल्या सहा महिन्यांत एकाएकी यत्र तत्र सर्वत्र भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचारच दिसू लागला आहे. कट्ट्यावर, फेसबूक, ट्विटरसारख्या माध्यमांत आणि प्रसार माध्यमातील भ्रष्टाचारावरील सगळी चर्चा निराधार, भडक, उथळ आणि अतिरंजीत स्वरूपाची असल्याने परिणामस्वरूप सर्वत्र भ्रष्टाचारविषयक सनकी प्रतिक्रिया ऐकायला मिळतात. देशात असे काही वातावरण निर्माण झाले आहे, की भुकेल्या माणसाला तुम्ही सर्वांत मोठी समस्या कोणती असा प्रश्न विचारला तर तोही भूकेऐवजी भ्रष्टाचार असेच उत्तर देईल! भ्रष्टाचार वाईट आहे, देश पोखरणारी ती कीड आहे आणि त्याविरुद्ध जर एवढे तीव्र वातावरण निर्माण होत असेल तर त्याचे स्वागत व्हायला पाहिजे असे कोणालाही वाटेल; पण सध्या सुरू असलेल्या चर्चेतून काय साध्य होत आहे? अशा चर्चेत आपण सहभागी झाला असाल तर देशात सुरू असलेल्या भ्रष्टाचारविषयक चर्चा गावगप्पा या सदरात मोडणाऱ्या आहेत या मताशी सहमत व्हायला तुम्हाला अडचण जाणार नाही. वास्तविक सध्या सुरू असलेल्या चर्चेचा दर्जा व परिणाम हा गावगप्पांपेक्षाही वाईट आहे. गावगप्पा ज्याला म्हणतात त्या घटकाभरच्या मनोरंजनासाठी होतात. त्याचे फारसे दूरगामी परिणाम होत नाहीत; पण भ्रष्टाचारावरील गावगप्पांचे विपरीत परिणाम आत्ताच जाणवू लागले आहेत. सर्वच राजकारणी भ्रष्ट आहेत व सर्वच राजकीय संस्था भ्रष्टाचाराने बरबटल्या आहेत आणि आता चांगले काही शिल्लकच राहिले नसल्याची भावना या गावगप्पांतून निर्माण झाली आहे. यातून देशाच्या एकूणच राजकीय व्यवस्थेविषयी घृणा निर्माण होऊ लागल्याने लोकशाही संस्था कमजोर होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यातून सर्वत्र विक्षिप्त निराशेचे वातावरण तयार होत आहे. या गावगप्पांमध्ये अग्रणी सर्वसामान्य नाही, तर प्रसारमाध्यमे आहेत. थोर समजले जाणारे विचारवंत व स्तंभ लेखक आहेत. विविध वृत्तवाहिन्यांवर चर्चेसाठी आणून बसविलेले ठोकळ आहेत. भ्रष्टाचाराच्या निमित्ताने आधीपासूनच नकोशी असलेली लोकशाही व्यवस्था किती कूचकामी आहे हे दाखविण्याचा आटापिटा त्यांनी चालविलेला आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या मुंबई आवृत्तीच्या विद्वान संपादकाने पंतप्रधानांना लिहिलेल्या जाहीर पत्रात सर्व राजकीय नेते भ्रष्ट आहेत, देशाच्या राष्ट्रपती भ्रष्ट आहेत असा बेलगाम आरोप केला होता. याच दैनिकात प्रितीश नंदी नावाच्या दुसऱ्या विद्वानाने लिहिलेल्या लेखात मतदारांनी सगळे चोर निवडून दिले असे गरळ ओकले. मंत्रिमंडळात सगळे चोर, लुटारू, बदमाश भरल्याची अतिरेकी आणि अतिरंजित टीका त्यांनी या लेखात केली. अशा प्रकारचे जहरी आणि बेजबाबदार लिखाण करून, भाषणे करून एक उन्मादी वातावरण लोकशाही व्यवस्थेविरुद्ध तयार करण्यात येत आहे. सर्वांत कहर म्हणजे या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी खंबीर भूमीका आणि वादग्रस्त विषयांची पारदर्शी स्पष्टीकरणं घेऊन जनतेसमोर येण्याची आवश्यकता असताना सरकार व पंतप्रधान हातावर हात धरून बसून आहेत. अशा परिस्थितीत प्रसारमाध्यमांनी ज्याना गांधीवादी असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे ते अण्णा हजारे येत्या १६ ऑगस्टपासून भ्रष्टाचार



सुधाकर जाधव

निर्मुलनार्थ लोकपाल यासाठी उपोषणाला बसणार असल्याने उन्मादाचा पारा वाढला नाही तरच नवल! शेंबड्या पोरापासून ते स्वच्छ नाकाच्या थोरापर्यंत सर्वांनाच एकाएकी या देशातील सर्वव्यापी भ्रष्टाचारावर नामी उपाय सापडल्याचा साक्षात्कार झाला आहे. आजपर्यंत अडगळीत पडून असलेला लोकपाल हाच भ्रष्टाचार संपविण्याचा एकमेव व जालीम मार्ग आहे याची त्यांना खात्री वाटू लागली आहे . हा लोकपालही भूषण, केजरीवाल आणि किरण बेदी यांच्या सुपीक डोक्यातून जन्मलेला आणि अण्णांच्या मुखातून बाहेर पडलेलाच असला पाहिजे आणि तोसुद्धा १-२ महिन्यात सर्व लोकशाही संस्थाच्या डोक्यावर बसला नाही तर भारतबुडी होणार या थाटात सगळे सुरू आहे.

**उन्मादी वातावरण**

२जी स्पेक्ट्रम चा 'महाघोटाळा' समोर करून लोकपाल नावाची शक्तीमान नोकरशाही लादून घेण्यासाठी भावनीक लाट देशात निर्माण करण्यात अण्णांच्या टीमला कमालीचे यश लाभले आहे. हे यश एवढे जबरदस्त आहे, की लोकपाल संस्थेने भ्रष्टाचार कमी होईल असे म्हणणारे मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहेत, असे सतत बोलणारे डावे पक्ष व त्यांचे विचारवंत लोकपालसाठी अण्णांइतकेच उतावीळ झाले आहेत! आणि विरोधी पक्ष म्हणजे सरकारच्या विरोधी भूमिका घेणारा पक्ष अशा बाळबोध भूमिकेत सतत वावरणारा भारतीय जनता पक्ष अण्णांच्या मागे उभा राहणारच होता. सरकारनेही झटपट लोकपाल विधेयक मांडण्याची तयारी करून या भावनिक लाटेच्या प्रभावात असल्याचे दाखवून दिले आहे. राजकीय पक्षांचे सोडा. ते नेहमीच संधीसाधू व सोयीस्कर भूमीका घेत आले आहेत; पण देशाचे सर्वोच्च न्यायालयसुद्धा निर्माण झालेल्या उन्मादाच्या लाटेने प्रभावीत झाल्याचे दिसून येते. कोतवाल आणि न्यायधीश अशा एकाच भूमीकेत उच्च आणि सर्वोच्च न्यायालय वावरू लागली आहेत. भ्रष्टाचाराच्या ज्या प्रकरणांच्या निमित्ताने देशात उन्मादाचे वातावरण निर्माण झाले आहे त्या प्रकरणांतील आरोपींना नैसर्गिक न्याय नाकारण्यापर्यंत न्यायालायांची मजल गेली आहे. उन्मादी वातावरण किती घातक असते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

**निराधार व फसवे आकडे**

राजकीय पक्षांची कणाहीन शरणागती देशाला संकटात लोटणारी असल्याने नागारिकांनीच भावनेच्या प्रवाहातून बाहेर पडून लोकपाल विधेयकावर आणि भ्रष्टाचाराबद्दल जे वातावरण निर्माण झाले आहे त्यावर पुनर्विचार करण्याची गरज आहे. मनमोहन सरकार हे सर्वाधिक भ्रष्ट सरकार आहे हे बोलण्यासाठी ठीक आहे; पण वस्तुस्थितीही तपासली पाहिजे. आजचा भ्रष्टाचार आम्हाला जीवघेणा वाटायला लागला ते समोर आलेल्या आकड्यांवरून. आजपर्यंत ५०-६० कोटींचा बोफोर्स घोटाळा हे आमचे सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार मोजण्याचे गेल्या वीस वर्षातील मोजमाप होते. हजार कोटी आणि लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार या मोजमापाने मोजण्या पलीकडचा होता! तुम्ही जर बारकाईने अभ्यास केला किंवा निरीक्षण केले तर या वाढीमधली तर्कसंगती तुमच्या लक्षात येईल. ५०-६० कोटींचा घोटाळा उजेडात आला तेव्हाचे राष्ट्रीय उत्पन्न आणि गेल्या वीस वर्षांतील उदारीकरण व तंत्रज्ञान यांच्या आधारे भारतीय अर्थव्यवस्थेने घेतलेली झेप या कारणांनी आज राष्ट्रीय उत्पन्नात कैकपटींनी वाढ झाली आहे. त्याच प्रमाणात भ्रष्टाचारही वाढला आहे! शिवाय 'माहितीचा अधिकार' यातून अनेक प्रकरणे उघडकीस येण्यास मदत झाली. आर्थिक प्रगतीकडे दुर्लक्ष करून फक्त भ्रष्टाचारातील प्रगती पाहिल्याने आज भ्रष्टाचार हीच आम्हाला एकमेव समस्या वाटू लागली आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे २जी संबंधीचे आकडे निराधार आहेत. कारण २जी स्पेक्ट्रमची किंमत काय असावी याला आधार नाही. गरज व उपयुक्तता याआधारे त्याची किंमत ठरते. भारत सरकारच्या महालेखा परीक्षकाने ठरविलेली किंमत आणि दूरसंचार मंत्री सांगतात ती किंमत या दोन्हींमध्ये हा भ्रष्टाचाराचा आकडा असू शकेल. म्हणूनच हा किती हजार कोटीचा घोटाळा आहे हे ठाम सांगता येत नाही. मी येथे कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराचे समर्थन करीत नाही, तर त्याची तर्कसंगत मांडणी करण्याचा हा प्रयत्न आहे. आकडे बदलले असतील; पण लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी ७० च्या दशकात उभ्या केलेल्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाच्या वेळी भ्रष्टाचाराची जी तीव्रता होती त्यापेक्षा आज अधिक आहे असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही हे त्या वेळची स्थिती लक्षात घेता म्हणता येईल. ज्या २जी भ्रष्टाचारावरून जनमानस लोकपालला संकट विमोचक म्हणून स्वीकार करू पाहते आहे ते २जी प्रकरण राजकीय नेतृत्वाच्या अनास्थेतून आणि अक्षमतेतून घडले आहे हे या प्रकरणाच्या न्यायालयातील सुनावनीवरून स्पष्ट होत चालले आहे.

**नेतृत्वाच्या अक्षमतेचा परिणाम**

न्यायालयीन सुनावणीत ए. राजा यांनी स्वत:ला वाचाविण्यासाठी पंतप्रधानांवर आरोप केलेत असे गृहीत धरले तरी त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे अजिबात दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत. यात पंतप्रधान हस्तक्षेप करू शकत होते; पण त्यांनी तो केला नाही हे राजाचे म्हणणे उडवून लावण्यासारखे नाही. स्पेक्ट्रम वाटपात गैर घडत आहे याची कल्पना मार्क्सवादी खासदार सीताराम येच्युरी यांनी पंतप्रधानाना पत्र लिहून आधीच दिली असतानाही पंतप्रधानांनी वेळीच हस्तक्षेप न करून एका महाघोटाळ्याचा मार्ग प्रशस्त केला यापेक्षा वेगळा निष्कर्ष काढताच येत नाही. पंतप्रधानांची या प्रकरणातील अनास्था आणि निष्क्रियता हीच त्यांची सर्वात मोठी आक्षेपार्ह कृती आहे! केवळ २जी प्रकरणातून पंतप्रधानांची अक्षमता सिद्ध झाली असे नाही. अण्णा व बाबांचे आंदोलन हाताळण्यातही त्यांना मुत्सद्दीपणा दाखविता आला नाही. या दोहोंच्या बाबतीत त्यांची भूमिका एका टोकाला शरणागतीची व दुसऱ्या टोकाला हडेलहप्पीची राहिली आहे. अशी आंदोलने हाताळण्यात आपण नवखे असल्याचे त्यानी दाखवून दिले आहे. परिणामी ज्यांना सामाजिक-राजकीय अशी काहीच जाण नाही अशा बाबा-अण्णांच्या प्रभावाखाली दूरगामी परिणाम करणारे निर्णय त्यांना घ्यावे लागत आहेत. नेतृत्व नसलेले सरकार अशी केंद्र सरकारची अवस्था झाल्याने केंद्र सरकार हतबल असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. अण्णांचे १६ ऑगस्टपासूनचे नियोजित उपोषण झालेच तर जो भावनोन्माद निर्माण करण्याचा प्रयत्न होईल. त्याला तोंड देण्याची क्षमता मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वात अजिबात नाही हे आधीच सिद्ध झाले आहे. असे नेतृत्व नवीन घोटाळ्यांना जन्म देण्यासोबतच देशाला अस्थिरतेच्या गर्तेत लोटण्याचा धोका आहे. मनमोहनसिंह यांची आर्थिक क्षेत्रातील कामगिरी वाखाणण्यासारखी असली तरी त्यांच्यात देशाला राजकीय नेतृत्व देण्याची अजिबात क्षमता नाही हे ताज्या घडामोडीने सिद्ध केले आहे. राजकीय अक्षमतेने आर्थिक क्षेत्रातील त्यांच्या कर्तृत्वालाही ग्रहण लागून ते झाकोळत चालले आहे. देशाला आज खरी गरज सक्षम व खंबीर पंतप्रधानाची आहे. निवडून दिलेल्या लोक प्रतिनिधीला

परत बोलाविण्याचा वैधानिक हक्क जनतेला देण्यात आला नसल्याने आजच्या घडीला पंतप्रधान बदलणे आपल्या हाती नाही हे खरे; पण म्हणून लोकपाल हा त्याचा पर्याय ठरू शकत नाही.

**लोकपालाची गरजच नाही!**

आज अस्तित्वात असलेला भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा किती कडक आहे हे राजा, कलमाडी, कनिमोळी अशा दिग्गजांना गजाआड करून सिद्ध झाले आहे. तरीही सध्याच्या कायद्यात त्रूटी आहेत ही बाब निर्विवादपणे सत्य आहे. सध्याच्या कायद्यान्वये लोकसेवकावर खटला चालविण्यासाठी पूर्व परवानगी लागते. अशी परवानगी देण्यात चालढकल केली जाते हा आरोपही खरा आहे. शिवाय वर्षानुवर्षे खटले लांबत राहतात या आरोपातही तथ्य आहे; पण आजच्या कायद्यात दुरुस्त्या करून परवानगीची अट काढता येईल. शिवाय अशा खटल्याचा निकाल देण्यासाठीचा कालावधी निश्चित केला जाऊ शकतो. अण्णांच्या टीमला निवडणूक आयोगाप्रमाणे स्वायत्त संस्था पाहिजे आहे. ती सतर्कता आयोगाच्या रूपात आजही अस्तित्वात आहे. निवडणूक आयोगासारखे बहुसदस्यीय आयोगात याचे रूपांतर करता येईल. या आयोगाच्या निवडप्रक्रियेत पारदर्शी बदल करून व भ्रष्टाचाराची प्रकरणे तपासून खटले भरण्याचे अधिकार दिले तर लोकपालची गरजच राहत नाही. पंतप्रधान लोकपालाच्या कक्षेत असावा की नसावा ही निरर्थक डोकेफोड करण्याची गरजही राहणार नाही. कारण आजचा भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा पंतप्रधानांनाही लागू आहे! अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या दुरुस्तीचा सोपा मार्ग उपलब्ध असताना लोकपालाच्या मागणीसाठी देश वेठीला धरला जातो आणि थोर थोर समजले जाणारे समाजधुरीण, पत्रकार व विचारवंत लोक बिनडोकपणे या मागणीचे समर्थन करतात हा आमच्या अविवेकाचा व वैचारिक दिवाळखोरीचा सर्वांत मोठा पुरावा आहे. अण्णांच्या जनलोकपाल बिलातील तरतुदी आणि याच बिलाचा आग्रह लक्षात घेतला तर जनतेतून निवडून येण्याची शक्यताच नसलेले लोक लोकपाल संस्थेच्या माध्यमातून देशाची सत्ता आपल्या मुठीत ठेवण्याच्या हेतूने झपाटले तर नाहीत ना अशी शंका घेण्याला नक्कीच वाव आहे

**पांढरा हत्ती!**

देश आधीच अनेक पांढरे हत्ती पोसून बेजार झाला आहे. उत्पादक अर्थकारणाशी कवडीचा संबंध नसलेले हे सगळे लोक उत्पादक शक्तींच्या दारात लोकपालच्या रुपात आणखी एक पांढरा हत्ती घेऊन उभे ठाकले आहेत. सरकार आणि अण्णा यांच्यात जो वाद आहे तो फक्त हत्ती आमचा धष्टपूष्ट आहे की, तुमचा एवढाच वाद आहे! अण्णा म्हणतात आमच्या हत्तीला सूळे आहेत सरकारच्या हत्तीला नाहीत; पण सूळे असो नसो हत्तीच्या खाण्यावर परिणाम होत नसतो! अण्णा हजारे यांचा दुराग्रह मान्य केला तर लोकपाल यंत्रणेवर वर्षाकाठी देशाला ७५००० ते ८०००० कोटींचा खर्च येईल! जसजसे सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढेल त्या प्रमाणात हा खर्चही प्रत्येक वर्षी वाढता राहील. आजची नोकरशाही पोसण्यासाठी देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना व कष्टकऱ्यांना दारिद्र्याचे चटके सहन करावे लागत आहेत, लोकपालच्या नोकरशाहीने त्यांच्या दु:खात अधिक भर पडणार आहे. आपण आतापर्यंत चार-पाच मंत्र्यांना घरी पाठविले आहे या फुशारकी सोबत 'मी देशाला लोकपाल दिला' अशी नवी फुशारकी अण्णांना मारता यावी यासाठी देश लोकपाल नावाचे लोढणे आपल्या गळ्यात बांधू शकत नाही हे अण्णांना सांगण्याची गरज आहे. हे सांगण्याची सरकारमध्ये धमक नसल्याने जनतेनेच पुढाकार घेऊन ठणकावून सांगितले पाहिजे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

**पान ४ हून पुढे**

करताना ज्या समस्या उभ्या रहात आहेत, तसेच 'अन्नसुरक्षितते'ची जी समस्या समोर आ वासून उभी ठाकली आहे त्या सर्व सहज सुटल्या असत्या. जयराम रमेशांनी हा मसुदा लिहिताना ज्या समस्यांची जंत्री मांडली आहे त्या सोडविण्याचा आदर्श उपाय एकच आहे - ज्या शेतकऱ्यांना जमीन कसण्याची इच्छा आहे त्यांना समाजवादी अर्थव्यवस्थेने आजवर लादलेल्या सर्व निर्बंधांतून मुक्त करून शेती करू द्यावी नाही तर, मुंबईच्या कापडगिरण्या दिवाळखोरीत गेल्यानंतर गिरणीमालकांना त्यांच्या ताब्यातील जमिनींची विल्हेवाट लावण्याचे स्वातंत्र्य दिले त्याच धर्तीवर शेतकऱ्याला आपल्या जमिनी त्यांना वाटेल त्याला, वाटेल त्या वेळी आणि त्याला रुचेल व पटेल त्या किंमतीत विकण्याचे स्वातंत्र्य द्यावे.

फक्त एकपिकी कोरडवाहू जमीनच संपादित केली जाईल, एकापेक्षा अधिक पिके देणाऱ्या व सिंचित जमिनी कोणत्याही परिस्थितीत संपादित केल्या जाणार नाहीत हा जयराम रमेशांनी या मसुद्यात दाखविलेला 'दिलदारपणा' शेतकऱ्यांनी आतापर्यंत सरकारच्या सततच्या शेतीविरोधी धोरणांमुळे जे घाव सोसले आहेत त्यांवर फुंकर घालण्यास अगदीच अपुरे आहेत. खरे तर ही कल्पनाच चीड आणणारी आहे. हे म्हणजे घरात घुसलेल्या एखाद्या दरोडेखोराने घर लुटून झाल्यावर बिचाऱ्या घरमालकाला जाता जाता 'तुझ्या गोंडस व अधिक सुंदर मुली राहू देतो तुझ्याकडे, तुझ्या कमी सुंदर मुली मी घेऊन जातो' असे म्हणण्यासारखे आहे.

जयराम रमेशांनी, आपल्या या मसुद्यात, प्रामाणिकपणे कबूल केले आहे की आतापर्यंतच्या भूसंपादनाच्या बहुसंख्य प्रकरणांत पुनर्वसन व पुनर्वसाहत ही कामे पूर्ण झालेली नाहीत. काही काही प्रकरणांत तर भूसंपादनानंतर अनेक दशके उलटूनही विस्थापित शेतकरी कुटुंबे वाऱ्यावर वणवण भटकत आहेत, त्यातले कित्येक देशोधडीला लागले आहेत. तेव्हा जयराम रमेशांनी पहिल्यापासून सुरुवात करावी आणि भूसंपादन कायदा १८९४ व त्याच्यात आतापर्यंत केलेली मोडतोड, विशेषतः देशाच्या राज्यघटनेला नवव्या अनुच्छेदाचे कलम करताना व ते केल्यानंतर केलेली मोडतोड यांच्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या उगमाचा अभ्यास करावा हे सर्वांत उत्तम ठरेल.

(५ ऑगस्ट २०११)

**शरद जोशी**
sharadjoshi.mah@gmail.com

■■

# आर्थिक जगबुडी



गेल्या काही महिन्यांत जागतिक पातळीवर घडलेल्या काही महत्वाच्या घटना ज्यांचा परिणाम जगाच्या आर्थिक स्थैर्यावर होऊ शकतो त्या अशा :

- इजिप्तमध्ये झालेली क्रांती जिचा धसका चीनमधल्या राजकारण्यांनी घेतला
- युरोपवर आलेले आर्थिक संकट ज्यात ग्रीस, स्पेन, पोर्तुगाल, इटली या देशांच्या अर्थव्यवस्था डबघाईला आल्याचे स्पष्ट झाले. त्यांना सावरण्यासाठी युरोपातल्या इतर श्रीमंत देशांना या देशांची मदत करावी लागेल नसता युरोचे काय होईल हे सांगता येणार नाही.
- इंग्लंडवर आलेले आर्थिक संकट ज्यामुळे सरकारी खर्चात कपात करण्यात आली आणि कदाचीत त्याचाच परिणाम म्हणून जनतेत असंतोष पसरला आणि सगळा देश दंगलींच्या वणव्यात होरपळून निघाला.

हे सगळे काय कमी होते म्हणून अमेरिकेवर आलेले आर्थिक संकट ज्यामुळे जगातले शेअर बाजार पत्त्यांच्या बंगल्यासारखे कोसळले.

इजिप्तच्या जनतेने उठाव करून होस्नी मुबारकला सत्तेवरून हुसकावून लावले. जनतेने इंटरनेटचा वापर करून क्रांतीची माहिती इतर लोकांपर्यंत पोहोचवली. इतर माध्यमांवर बंधने आणता येतात; पण इंटरनेटवर बंधने आणणे सोपे नाही. याच क्रांतीपासून प्रेरणा घेऊन लिबीया, सिरिया येथेही जनआंदोलन सुरू आहेत. त्याच्या आधीच ट्युनिशिया या लहानशा देशातल्या नागरिकांनी तेथली सत्ता उलथून टाकली होती. याचा परिणाम चीनवर झाला. चिनी जनतेमध्ये सरकारविरुध्द असंतोष होताच. तो व्यक्त करण्यासाठी जनतेने इंटरनेटचा वापर सुरू केला आणि सरकारने इंटरनेटवरची बंधने जास्त वाढवली. तरीही जनतेचा रोष पाहूनच चिनी पंतप्रधानांना रेल्वे अपघातस्थळाला भेट देणे तसेच मृतांच्या नातेवाईकांना द्यायची मदत दुप्पट करणे भाग पडले. याचा आर्थिक संकटाशी संबंध असा आहे की जर उद्या जागतिक पातळीवर काही उलथापालथ झाली तर तिचा मोठा फटका चीनला बसू शकतो. जर तेथील जनता उठाव करायला उभी राहिली तर जगावर त्याचे परिणाम होऊ शकतात. म्हणून हे उठाव आणि जनतेमधला असंतोष याकडे दुर्लक्ष करता कामा नये.

ग्रीस हा युरोपीय देश दिवाळखोरीत निघाला आहे. २००० नंतर ग्रीसची आर्थिक प्रगती जोरात होती आणि त्यामुळे परकीय भांडवलाचा ओघ ग्रीसकडे वळला. १९७४ साली लोकशाही स्थापन केल्यापासून त्या देशात सरकारी नोकऱ्या आणि सरकारी योजनांवर प्रचंड खर्च करण्याची प्रथा सुरू झाली. जोपर्यंत आर्थिक प्रगती वेगात होती तोवर सरकारने अर्थसंकल्पीय तूट भरून काढण्यासाठी कर्जे घेतली. १९९३ पासून तर या कर्जाचे प्रमाण जीडीपीपेक्षाही जास्त होते. युरोपीय देशांच्या अर्थविषयक नियमांची पूर्तता करण्यासाठी ग्रीसने सरकारी खर्चाचे आकडेही चुकीचे दाखवले. या देशात जहाजांची वाहतूक आणि पर्यटन हे दोन व्यवसाय चालतात. २००८ च्या मंदीचा परिणाम त्यांवर झाला आणि देशाची अधोगती सुरू झाली. तरिही आकडेवारीमध्ये गडबड करून परकीय भांडवल त्या देशात जातच राहिले. शेवटी अती झाले तेव्हा ग्रीस आपली देणी चुकवू शकत नाही हे लक्षात आल्यावर जागतिक नाणेनिधी, युरोपीय वित्तसंस्था वगैरेंनी ग्रीसला नवे कर्ज दिले आणि सरकारी खर्च कमी करण्याची अट घातली. ग्रीसने आपले कर्ज बुडविले असते तर युरोचे खूप नुकसान झाले असते. ग्रीसच्या मुजोर सरकारी नोकरांनी आणि सरकारी भीकेवर जगण्याची सवय लागलेल्या जनतेने सरकारी खर्च कपातीविरुध्द निदर्शने-दंगली केल्या; पण ग्रीसला आर्थिक कपात करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता.

दुसरा युरोपीय देश आयर्लंडसुध्दा आर्थिक संकटात सापडला; पण त्याचे कारण वेगळेच होते. आयरिश बँकांनी जी गृहकर्जे दिली होती त्यांची हमी सरकारने घेतली होती. २००८ मधील आर्थिक संकटात ही कर्जे बुडाली आणि सरकारला बँकांच्या मदतीसाठी पुढे यावे लागले आणि त्याचे दिवाळे निघाले!

पोर्तुगालमध्ये जे झाले ते आपण विशेष करून लक्षात घेतले पाहिजे एवढेच नाही तर त्यापासून आपण धडा घेतला पाहिजे, नसता आपल्यावरही तीच वेळ येणार आहे हे नक्की. १९७४ पासून पोर्तुगाल सरकारने आपला खर्च मर्यादेबाहेर वाढवला (आठवा! सहावा वेतन आयोग!!) सोबतच खाजगी उद्योजकांसोबत संशयास्पदरीत्या भागीदारी केल्या, पात्रता/आवश्यकता नसलेल्या संस्थांना सल्लागार म्हणून नेमून पैसे दिले (२जी स्पेक्ट्रम किंवा राष्ट्रकूल खेळ घोटाळा आणि राज्यात जागोजागी चालू असलेले 'टोल' नाक्याचे घोटाळे) त्याच बरोबर सरकारी योजनांवर जे पैसे खर्च झाले त्यात 'गळती' होऊ दिली (आपली रेशन व्यवस्था किंवा म.गां.ग्रामीण रोजगार योजना आठवा) त्याचसोबत अकार्यक्षम तसेच अनावश्यक नोकरांची भरती केली. याचा एकत्रित परिणाम पोर्तुगालच्या दिवाळखोर होण्यावर झाला आणि पुन्हा युरोपीय वित्तसंस्थांना त्या देशाला आर्थिक मदत करावी लागली.

**ढासळलेली पत सुधारण्यासाठी अमेरिकेने तातडीने काय केले असेल तर ते म्हणजे पत दर्जा कमी करणाऱ्या संस्थेवर टीका आणि हीच बाब अधोरेखित करून त्या संस्थेने हे स्पष्ट केले की पत दर्जा कमी केला म्हणजे अमेरिका आपली कर्जे फेडू शकत नाही किंवा फेडणार नाही असा नव्हे तर एवढ्या गंभीर संकटाला अमेरिकी राज्यव्यवस्थेने (म्हणजे राजकारण्यांनी) ज्याप्रकारे तोंड दिले ते पाहता आम्ही पतदर्जा कमी केला आहे आणि यावरूनच हेही स्पष्ट होते की अशा प्रसंगी देशातील जनता स्वतःची कोणतीही चूक नसताना राजकारण्यांच्या चुकांचे फळ भोगते.**

इंग्लंडचीही आर्थिक प्रगती मंदावली. हळूहळू त्यांची अर्थव्यवस्था वाढण्याऐवजी घटली. शेवटी २०१० च्या सुमारास थोडी आर्थिक प्रगती झाल्यामुळे अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आल्याचे दिसले; पण त्यासाठी सरकारला आपला खर्च कमी करावा लागला, ज्याचा परिणाम जनतेच्या रोषात झाला. कदाचित त्याच कारणांनी तेथे ऑगस्ट महिन्यात दंगली पेटल्या! युरोपातील इतर देश स्पेन-इटली यांचीही आर्थिक परिस्थिती फारशी समाधानकारक नसून नाजूकच आहे.

थोडक्यात काय, तर युरोपातील देशांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. काही देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहेत. बहुतांश देशांत दिवाळखोरीचे मुख्य कारण सरकारने केलेला चुकीचा खर्च आणि भ्रष्टाचार आहे.

आता अमेरिकेची कहाणी.

अमेरिका सरकारचा खर्च त्याच्या उत्पन्नापेक्षा जास्तच आहे. १९३०ची मंदी आणि दुसरे महायुध्द यांचा एकत्रित परिणाम अमेरिकची वित्तिय तूट वाढण्यावर झाला. १९३३ मध्ये सरकारचे कर्ज उत्पन्नाच्या म्हणजे जीडीपीच्या २०% एवढे होते. १९३६ पर्यंत ते वाढून ४०% झाले. सत्तरीच्या दशकात ते २६% एवढे कमी झाले; पण बुश (थोरले) आणि रिगन यांच्या कृपेने १९८० च्या दशकाच्या अंतापर्यंत ते जीडीपीच्या ४१% एवढे झाले. २००० मध्ये ते जीडीपीच्या ३५% होते तेच २००८ पर्यंत ४०% झाले आणि २०१० मध्ये ६२% झाले; परंतु ते आता काळजी करण्याइतके वाढले आहे- म्हणजे १००% पेक्षा जास्त! याचाच अर्थ असा की सरकारचे कर्ज देशाच्या एका वर्षाच्या जीडीपीपेक्षाही जास्त आहे. जर सरकारला हे कर्ज दहा वर्षांत फेडायचे असले तर मुद्दल परत करण्यासाठी खर्चात निदान १०% कपात करावी लागेल आणि त्यावरच्या व्याजासाठी (जर ते व्याज ५% एवढे कमी जरी असले तरी जीडीपीच्या ३% कपात केवळ व्याजासाठी करावी लागेल!) वेगळीच. ज्या देशाची अर्थव्यवस्था अत्यंत कमी दराने वाढत आहे, ज्या देशात मंदीच्या भीतीने लोकांनी खर्च कमी केले आहेत, ज्या देशात बेरोजगारी खूप वाढल्यामुळे जनता चिंतीत आहे (अमेरिकेतील १०० पैकी केवळ ५८% प्रौढांना नोकरी आहे उरलेले बेकार आहेत!) जो देश अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी सरकारी मदतीवर अवलंबून असतो त्याच देशात सरकारने जर मदतीचा ओघ आटवला तर काय अरिष्ट ओढवू शकेल हे सांगायला कोणा अर्थतज्ज्ञाची गरज जोशी साहेबांकडून शेतीचे अर्थकारण समजून घेतलेल्या लाल बिल्ला लावणाऱ्या शेतकऱ्याला मुळीच नाही.

हे कशामुळे झाले हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. जॉर्ज बुश यांनी अमेरिकेला युध्दात पाडले. इराकचे युध्द, जे झाले सद्दामकडे महाभयंकर अस्त्रे आहेत म्हणून. सद्दामला ठार करून सगळा देश जवळपास बेचिराख केला तरीही संहारक अस्त्रे सापडलीच नाहीत; आणि त्या कारणाने युद्धावर जो खर्च झाला तो मातीत गेला. त्यानंतर लादेनने अमेरिकेवर जो हल्ला केला त्याचा बदला म्हणून तालिबानच्या ताब्यात असलेल्या अफगाणीस्तानावर हल्ला करून अमेरिकेने आपली युद्धाची खुमखुमी जिरवून घेतली. याही युध्दात अमेरिकेचे हजारो सैनिक ठार झाले आणि अब्जावधी डॉलर्स खर्च झाले. एवढे करून हा लादेन होता कुठे तर पाकिस्तानात! अमेरिकेच्या युद्धात तीची साथ देणाऱ्या पाकिस्तानात! या युद्धाबद्दल एक रंजक बातमी वाचायला मिळाली होती. ती अशी की अमेरिका सैन्यासाठी बंदरावरून त्यांच्या तळापर्यंत जी वाहने वापरल्या जातात त्या वाहनांना दर फेरीमागे जर १००० डॉलर्स एवढा खर्च द्यावा लागत होता तर त्या वाहनांचे मालक त्यातले ४०० डॉलर्स तालिबानला खंडणी म्हणून द्यायचे! म्हणजे एका अर्थाने अमेरिकेने तालिबानलाच पैसे पुरविले! एवढेच काय तर पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीचा गैरवापर पाकिस्तानने भारताविरुध्द लढणाऱ्या अतिरेक्यांना बळ देण्यासाठी केल्याचे जगजाहीर आहे. एवढेच काय तर काश्मिरचा प्रश्न जागतिक पातळीवरून पेटता ठेवण्यासाठी गुलाम फईसारख्या लोकांना आर्थिक मदतही केली हेही आता जगजाहीर आहे. यावरून जगात शांतता नांदावी म्हणून अमेरिकेने केलेला खर्च वाया गेला असेच म्हणावे लागेल.

पण जगात सुव्यवस्था राखायची जबाबदारी आपलीच आहे असा

आपल्या देशाकडे अमेरिकी सरकारचे १,७५,००० कोटी रुपयांचे बाँड आहेत. त्यातले २५% आपण गेल्या वर्षात घेतले आहेत. म्हणजे जी अर्थव्यवस्था घसरणीला लागल्याची चिन्हे आहेत तीमधे आपल्या सरकारने गुंतवणूक करून ठेवली. याच दरम्यान चीनच्या सरकारने आपल्या दसपट गुंतवणुक केली! जे देश आपला माल अमेरिकेला निर्यात करतात त्यांना असे करणे भाग पडते, कारण डॉलरची मागणी वाढली की किंमत वाढते आणि डॉलर महाग झाला की निर्यात जास्त फयदेशीर होते! त्याच बरोबर अमेरिकेने जगाच्या अर्थकारणात मारलेली दुसरी मोठी मेख अशी आहे की जगात क्रुड तेलाची खरेदी-विक्री केवळ डॉलर हे एकमेव चलन वापरून करता येते. जगातल्या सगळ्याच




देशांना त्यामुळे डॉलर्सची नितांत गरज असते आणि कदाचित त्यामुळेच अमेरिकेला आपण जगात सर्वशक्तीमान असल्याचे वाटत असावे! इराण, व्हेनेझुएला किंवा इराक या देशांनी डॉलरशिवाय दुसरे चलन स्वीकारून क्रुड विकण्याचे प्रयत्न केले म्हणूनच त्या देशांवर अमेरिकेने वाकडी नजर करून पाहिले अशी कुजबूज ऐकायला मिळत असते.

जर अमेरिकेत मंदीची सुरुवात झालीच तर त्याचा मोठा वाईट परिणाम आपल्या देशातल्या

अमेरिकेचा भ्रम आहे. वर वर दाखवायला जगाची सुरक्षितता असे कारण जरी अमेरिका सांगत असली तरी जगावर सत्ता राखण्याचा मोह त्या देशाला नेहमी होतो. अमेरिकेचे माजी संरक्षण उपसचिव जोसेफ नाय यांनी नुकत्याच लिहिलेल्या एका लेखावरून याची प्रचिती येऊ शकेल. ते म्हणतात चालू शतकादरम्यान जगातली निम्म्यापेक्षा जास्त जनता आशिया खंडात राहत असेल त्याच बरोबर जगाच्या आर्थिक उत्पन्नातील अर्धेउत्पन्न आशियातूनच होत असेल, असे असताना अमेरिकेचे आशियात आपला तळ मजबूत करणे आवश्यक आहे.

अशा या जगावर नियंत्रण करण्याचे स्वप्न बघणाऱ्या देशाने आपले खर्च वाढवून ठेवले आणि त्या प्रमाणात उत्पन्न वाढले नाही. अमेरिकेची अपरिमीत आर्थिक हानी करणारे इराक युद्ध ज्या बुश यांनी सुरू केले त्यांनीच जनतेला करांतून भरघोस सूट देऊन ठेवली. त्याचा परिणाम सरकारचे उत्पन्न घटण्यावर झाला. त्याचसोबत गरीब, निराधार जनता, वयोवृध्द नागरिक, निवृत्ती वेतनधारक नागरिक यांवर होणारा खर्च वाढतच गेला. त्यातच २००८ साली अमेरिकेतील प्रमुख बँकांनी घर खरेदीसाठी जी वसूल न होऊ शकणारी कर्जे दिली त्यामुळे बऱ्याच बँका दिवाळखोरीत निघाल्या. अशा बुडणाऱ्या बँकांसोबत अमेरिकेची अर्थव्यवस्थाच डळमळीत होण्याचा धोका उभा राहिला होता म्हणून अमेरिका सरकारने त्या बँकांना आर्थिक मदत देऊन संकटातून वाचविले आणि तूट भरून काढण्याकरिता जास्त पैसा छापून बाजारात ओतला. बँका जरी वाचल्या तरी अर्थव्यवस्था मात्र नाजूक झाली. त्याच सोबत उत्पन्न मात्र वाढले नाही. याचा परिणाम सरकारची वित्तीय तूट वाढण्यावर झाला.



अमेरिका सरकारला वित्तिय तूट भरून काढण्यासाठी कर्जे घ्यायची मुभा आहे. मात्र अशा कर्जाला काही मर्यादा आहे. तरीही ओबामांच्या आधीच्या अध्यक्षांनी गरज पडेल तेव्हा बरेचदा कर्जे घेतलेली आहेत. या वर्षी २ ऑगस्ट रोजी अशी परिस्थिती निर्माण होणार होती की अमेरिका सरकारकडे रोजचे खर्च भागवयला किंवा घेतलेल्या कर्जाची परतफेड करायला पैसे शिल्लक राहिले नसते आणि जर तसे झाले असते तर सरकारचे नाक कापल्या गेले असते या समस्येवर तातडीने तसेच कायमस्वरूपी उपाय शोधणे गरजेचे होते; पण अमेरिकेतले राजकारणी आपल्या देशातल्या राजकारण्यांपेक्षा फार वेगळे नाहीत. सर्वांनाच देशापेक्षा आपापल्या मतदारांची काळजी जास्त वाटते. रिपब्लिकन पक्ष जो पैसेवाल्यांचा म्हणून ओळखला जातो त्यास उत्पन्न वाढवण्यासाठी करांमधे वाढ करणे मान्य नव्हते तर डेमोक्रॅटिक पक्षाला जनहिताच्या योजनांवरील खर्चात कपात नको होती. जर दोघांचेही ऐकायचे तर तूट कमी कशी करायची? हाच प्रश्न सगळ्यांना पडला होता. हा गुंता इथेच संपत नाही. अमेरिकेच्या एका सभागृहात डेमोक्रॅटिक पक्षाचे बहूमत आहे तर दुसऱ्यात रिपब्लिकन पक्षाचे! त्यामुळे अमेरिकेच्या अध्यक्षांना मनमानी करून स्वत:ला पटणारा उपाय करणे शक्य नव्हते. अर्थात अध्यक्षास दिलेले काही खास अधिकार वापरून ओबामा स्वत:ला हवे ते करू शकले असते; पण त्यामुळे २०१२ साली होणाऱ्या निवडणुका त्यांना जड गेल्या असत्या कदाचित! त्यातच ते पडले जरा मवाळ स्वभावाचे. म्हणून त्यांनी वाटाघाटी सुरू केल्या. रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांशी तसेच आपल्याच पक्षातल्या; पण वेगळे मत असणाऱ्या नेत्यांशीही त्यांनी चर्चा सुरू केल्या. २ ऑगस्टचा दिवस

सॉफ्टवेअर उद्योगावर होईल आणि त्यामुळे जर देशात येणारा पैशांचा ओघ आटू लागला तर इतरही उद्योग मार खातील. त्यामुळे सरकारचे उत्पन्न बुडेल आणि मग सरकारची तूट वाढेल आणि अर्थातच आपलाही देश मंदीच्या विळख्यात सापडेल. आपल्या सरकारने जगातल्या इतर देशांच्या अनुभवावरून शहाणे होऊन अनावश्यक खर्चाला कात्री लावणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे तसेच पायाभूत सोयींची वेगाने उभारणी करून उद्योगांना प्रोत्साहन देणे या सारखे उपाय करून आपल्या देशाला मंदीच्या विळख्यात जाण्यापासून वाचवावे. त्याच सोबत शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन शेतमालाच्या व्यापारावरील जाचक बंधने काढून टाकून शेती मुक्त करावी ज्यामुळे आपला शेतकरी समृद्धीच्या वाटेवर चालू लागेल. देशातली निम्म्याहून अधिक जनता शेतीशी निगडीत असल्यामुळे असे झाल्यास आपला देश येऊ घातलेल्या मंदीला समर्थपणे तोंड देऊ शकेल याचा विश्वास वाटतो.

पण २००८च्या मंदीशी तुलना करता काही महत्त्वाचे आर्थिक घटक या वेळेस आपली साथ देणार नाहीत असे दिसत आहे. २००८ साली अमेरिकेत जेव्हा मंदी सुरू झाली तेव्हा आपल्या देशाची आर्थिक प्रगती ९.२% या वेगाने होत होती, औद्योगिक उत्पादन १५% पेक्षा जास्त वेगाने वाढत होते आणि महागाई निर्देशांक जरी १३ होता तरी तो उतरणीला लागला होता आणि महत्त्वाचे म्हणजे अर्थसंकल्पातील तूट ३% जवळपास होती. याचसोबत सरकारने जाहीर केलेला सहावा वेतन आयोग आणि सरकारने ग्रामीण रोजगार योजनेत ओतलेला पैसा तसेच शेतकऱ्यांची केलेली कर्जमाफी यामुळे ग्रामीण भारतात बऱ्यापैक पैसा खेळत होता. त्या तुलनेत सध्या आपली आर्थिक प्रगती ७% च्या वर गेली तर फार मोठी गोष्ट आहे असे अर्थतज्ज्ञ सांगत आहेत. औद्योगिक उत्पादन केवळ ७% च्या वेगाने वाढत आहे आणि महागाई कमी होण्याची कोणतीही चन्हे नाहीत आणि म्हणूनच अमेरिकेत जर मंदी आली आणि आपले राजकारणी त्यांच्या लौकिकाला साजेसेच वागले तर आपले काही खरे नाही! कदाचित एका मोठ्या भयंकर मंदीला तोंड देण्याची वेळ आपल्यावर येऊ शकते अशी भीती साधार वाटत आहे.

जसजसा जवळ येऊ लागला तशी आर्थिक जगतात अस्वस्थता पसरू लागली. सर्वमान्य तोडगा सापडण्यास वेळ लागत आहे हे पाहून अर्थतज्ज्ञांनी सरकारच्या नाकर्तेपणावर टीकेची झोड उठविली. या सर्वांचा परिणाम अमेरिका अर्थव्यवस्थेवरील जगाचा विश्वास कमी होण्यात झाला. त्यातच ओबामांनी कसेबसे आर्थिक प्रश्नावर तोडगा शोधण्यात यश मिळवले; पण ती कसरत करताना ते आणि त्यांच्या सर्वपक्षीय साथीदारांनी देशाच्या आर्थिक पतीची हानी करून ठेवली होती. एवढा मोठा देश एवढी मोठी अर्थव्यवस्था आणि येणाऱ्या समस्येची पूर्वकल्पना असतानासुद्धा तिचे उत्तर शोधण्यात एवढा भोंगळपणा! सारेच अविश्वसनीय आणि हाच सूर पकडून स्टँडर्ड अँड पूअर्स या पत ठरविणाऱ्या संस्थेने अमेरिकेची पत सर्वोच्च अशा 'ट्रिपल ए' वरून 'एए+' म्हणजे एक पायरी खाली केली. त्याचा परिणाम जगातल्या शेअर बाजारांवर झाला. ते सगळे बाजार कोसळले.



युरोपात आर्थिक मंदी, अमेरिका २००८ च्या मंदीतून बाहेर येण्याआधीच आपली पत घालवून बसलेला आणि तोही मंदीच्या उंबरठ्यावरच. एवढेच काय तर चीनमध्येही आर्थिक आघाडीवर चलनफुगवट्याचा धोका दिसतच आहे. त्यातच जनतेमधला वाढणारा असंतोष. पाकिस्तान-अफगाणिस्तानबद्दल न बोललेलेच बरे. आपल्या देशातही सरकारच्या नाकर्तेपणामुळे आणि रोज नव्याने बाहेर येणाऱ्या घोटाळ्यांमुळे अर्थव्यवस्था घुसळून निघालेली आणि नाजूक! आणि त्यामुळेच जगातल्या कित्येक देशांतल्या नाकर्त्या-भ्रष्ट सरकारांमुळे सगळे जगासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहू शकते अशी चिन्हे दिसत आहेत.

ढासळलेली पत सुधारण्यासाठी अमेरिकेने तातडीने काय केले असेल तर ते म्हणजे पत दर्जा कमी करणाऱ्या संस्थेवर टीका आणि हीच बाब अधोरेखित करून त्या संस्थेने हे स्पष्ट केले की पत दर्जा कमी केला म्हणजे अमेरिका आपली कर्जे फेडू शकत नाही किंवा फेडणार नाही असा नव्हे तर एवढ्या गंभीर संकटाला अमेरिकी राज्यव्यवस्थेने (म्हणजे राजकारण्यांनी) ज्याप्रकारे तोंड दिले ते पाहता आम्ही पतदर्जा कमी केला आहे आणि यावरूनच हेही स्पष्ट होते की अशा प्रसंगी देशातील जनता स्वतःची कोणतीही चूक नसताना राजकारण्यांच्या चुकांचे फळ भोगते. त्यामुळे प्रशासन तथा राज्यव्यवस्था चालवणाऱ्या संस्था, लोक हे कार्यक्षम, निष्कलंक, तसेच भ्रष्टाचारापासून मुक्त असणे किती गरजेचे आहे हेही दिसून येते. कारण झालेले आर्थिक नुकसान भरून येऊ शकते; पण गेलेली पत पुन्हा मिळविणे फार अवघड असते.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानलपेठ, परभणी-४३१४०१
मोबाईल : ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■

# अखिल भारतीय किसान समन्वय समितीच्या वतीने देण्यात आलेले निवेदन

**_BHUPINDER SINGH MANN_**
National President, BKU
Ex Member Parliament, (Rajya Sabha)
President All India Kisan Coordination Committee (KCC)
Mobile: 9814013485

**_BALDEV SINGH MIANPUR_**
President, BKU, Punjab
Mob:9814261211

**_PARVEEN MATHANA_**
General Secretary, BKU, Haryana
Mob: 09896020571

**BHARTIYA KISAN UNION**
Office First floor: 1091, Phase 5,
Mohali – 160059
Punjab
Phone/fax:
0172–4511872, 01871–270766

**Dated: 11.8.2011**

**<u>MEMRORANDUM</u>**

1 His Excellency Governor of Haryana,
Haryana Raj Bhawan,
Chandigarh.

2 His Excellency Governor of Punjab,
Punjab Raj Bhawan,
Chandigarh.

Sir,

We intend to bring to your kind notice through this Memorandum about the Hansi Butana Canal being constructed by Haryana Government and in the light of the said controversy would also like to highlight a murderous attack which was made on Shri Guni parkash President of the Haryana BKU on 31$^{st}$ July near Barwala, since Shri Guni parkash was spearheading the movement.

Shri Guni parkash was admitted to PGI in a serious condition due to injuries inflicted by bullet wounds and gave his statement to the police about the incident and named the persons he had identified during the attack. However it is shocking that instead of arresting the culprits the police has filed a case against Shri Guni parkash and another three persons alleging that Shri Guni parkash has himself got himself shot. It may also be pertinent to mention here that even the statement given by Shri Guni parkash to the concerned authorities in critical condition has been tampered with as Shri Guni parkash has named a few high ranking police officials and instead of probing the matter, the police authorities are trying to hush up the matter and threats are being issued to the complainant of dire consequences which clearly can be seen from the act and

conduct of the police authorities. The most glaring aspect being that instead of bringing the wrong doers to book, the authorities have registered a case against Shri Guni parkash of arranging a murderous attack on himself which defies any logic. It would be fair to state here that Shri Guni parkash is still battling in PGIMER. While condemning these attacks, we apprehend that even our lives and personal liberty might also be under threat so as to stop us from expressing our views.

It is important to bring to your kind notice that on 29/07/2011, the farmers of Punjab and Haryana under the leadership of S. Baldev Singh Mianpur and Shri Guniparkash, Presidents of Punjab and Haryana BKU respectively, had condemned the Punjab and Haryana Governments for the construction of the unplanned Hansi Butana canal which has caused flooding in many parts of Punjab as well as Haryana. Hitherto, the Punjab Government has been blaming the Haryana Government for the flooding caused in Punjab and Haryana areas due to construction of the Hansi Butana canal.

On 29/07/2011 it was for the first time that even the farmers of Haryana came out openly against this canal and blamed that many areas of Ambala, Karnal and Kaithal have been flooded because of this canal. Shri Guni parkash during the press conference had condemned the construction of the canal and had also demanded that criminal cases be registered against the officers who are involved in the design/planning and construction of this technically incorrect Hansi Butana canal. Shri Guni parkash has also been vocal and struggling to protect the rights of farmers of Haryana whose lands are being acquired by the Haryana Government. Various news cuttings in this regard are enclosed, which is one of the reasons for Shri Guni Parkash being targeted.

BKU feels that the Haryana Government has not been able to digest that a farmer leader from Haryana would appose the Hansi Butana Canal. Thus to teach him a lesson, the Haryana Government has slapped various cases including this one on Shri Guni parkash. The BKU (Punjab & Haryana) fully supports Shri Guniparkash and condemns the Haryana Government for this action. Not to mention that Shri Guni parkash is also a member of Kisan Coordination Committee (KCC) and has been a social activist working in the interest of farmers in this agrarian economy. KCC, is a non political, peaceful organization of farmers bodies of various states including Punjab, Haryana, Maharashtra, Gujrat, MP, UP, Kerala, Tamil Nadu, Andhra Pradesh, Karnataka wherein socio-economic issues of farmers are highlighted for the upliftment of farmers and rural mases while peacefully carrying on the farmers movement.

Through this memorandum addressed to the His Excellences, Governors of Punjab and Haryana, the BKU of Puniab and Harvana here bv submit as:-

1. That a probe be conducted by any independent agency like the CBI or by a retired High Court Judge into the attack on Shri Guni parkash, President BKU, Haryana and the cases filed against Shri Guni parkash should be immediately withdrawn, and the culprits of attack be brought to law.
2. That a high level probe be got conducted into the construction of the Hansi Butana Canal which is technically incorrect and which is obstructing the natural flow of rain water and river Ghaggar resulting in flooding of many districts of Punjab as well as Haryana.
3. That further construction of the toe wall should be immediately stopped.
4. That a detailed Technical Audit should be conducted by an independent engineering body on the "technical feasibility" keeping in view the "Levels" at intake and the tail end, mapping of natural flow of rain water in the regions of Punjab and Haryana which are effected by this canal, the design adopted in constructing the canal, especially making provision for adequate cause ways for the flood water.
5. That the Governments of Punjab and Haryana be restrained from playing politics on this emotional issue which is equally affecting the people of Punjab and Haryana. The politics is heading to make this a Punjab versus Haryana issue which is highly incorrect and condemnable.

Thanking you,

Sincerely,

| -sd- | -sd- | -sd- |
|---|---|---|
| **Bhupinder Singh Mann]** | **[Baldev Singh Mianpur]** | **[Parveen Mathana]** |

CC:

1. The Prime Minister India, South block, Raisina Hill,New Delhi.
2. Chief Justice of India, Hon'ble Supreme Court New Delhi.
3. Smt. Sonia Gandhi, President Indian National Congress, 10 Janpath, New Delhi.
4. Chairman National Human Rights commission, Faridkot House Copernicus Marg, New Delhi.
5. Chief Justice, Punjab and Haryana High Court
6. Director General Police, Haryana
7. Director General Police, Punjab

# पंतप्रधान मनमोहन सिंग यांना मा. शरद जोशी यांनी लिहिलेले पत्र

**SHARAD JOSHI**

**Member of Parliament ( Rajya Sabha) 2004 - 2010**

**National President, Swatantra Bharat Pakhsha**

Angarmala Village & PO: Ambethan;

Taluka: Khed; District: Pune, Maharashtra, 410501

Date: 12 August 2011

**To**
**Hon. Dr. Manmohan Singh**
**Prime Minister**
**Government of India,**
New Delhi – 110001

Respected Sir,

I am writing this letter with the hope that you would have already received a copy of the Memorandum sent by the President of the Kisan Coordination Committee (KCC) Sardar Bhupinder Singh Mann, former Member of Parliament, addressed to the Governors of Haryana and Punjab.

I am very much disturbed by the developments in Punjab/Haryana. Evidently, somebody is trying to sow seeds of dissention between Haryana and Punjab by making Hansi Butana Canal a partisan issue. I am particularly disturbed because of the fact that Shri. Guni Prakash, the main party involved, is my personal friend and a very respectable member of the Kisan Coordination Committee. What has happened to him seems to be on all fours with the case of Mr. Sathe in the case of Police firing in Maval area of Maharashtra state. Mr. Sathe was seen on the television channel as arrested by the Police and his name appears amongst those killed in Police firing which happened only after his arrest. I am rather pained at the fact that these two incidences should have happened while you are leading the destiny of this country and the destiny of the farm community.

I formally associate myself with the 5 proposals made at the end of the Memorandum and endorse the demand that a technical audit should be carried out about the Hansi Butana Canal and the matter should be dealt with on strictly non-partisan lines.

I am asking my colleagues from Maharashtra to visit the grievously injured Mr. Guni Prakash in the PGIMER, Chandigarh and make a report to me. I shall take any harm coming to Guni Prakash as harm inflicted personally on me and that would force me to get back into agitational activities after my retirement as a member of Rajya Sabha.

I hope, you are already in the know that when I was in Delhi on the $10^{th}$ of February 2011 to attend an IFPRI conference, unfortunately, I fell down the staircase of Radisson Hotel and has been badly injured and incapacitated from all public work since then.

I trust you will take necessary action in order to ensure that no eventful action taken against Guni Prakash because he happens to be most articulate leader of the Haryana farmers leading prominently the farmers agitating for their just cause.

With regards.

Yours faithfully,

**Sharad Joshi**

Pune Address: A 1001, Devi Orchid, Bhau patil Road, Bopodi, Pune 411020
Mobile: 98810 93307 e-mail: sharadjoshi.mah@gmail.com Web: www.shetkari.in

# बरं झालं देवाबाप्पा...

**[ मुक्तअर्थव्यवस्थेचा पुरस्कार करण्यासाठी जेव्हा या देशातले मोठमोठे उद्योगपती, नामवंत अर्थशास्त्रज्ञ, अर्थशास्त्राचे प्राध्यापक जेव्हा कचखाऊ वृत्ती बाळगून आहे, तेव्हा या देशातला अनपढ-अनाडी शेतकरी मात्र मुक्तअर्थव्यवस्थेच्या बाजूने खंबीरपणे उभा ठाकला आहे. जे भल्याभल्यांना समजत नाही ते अर्थशास्त्र शेतकऱ्यांना कळलेले आहे आणि हा चमत्कार शरद जोशी नावाच्या वादळाने घडवून आणला आहे. ]**

दोन दिवसांपूर्वी मी एका वृत्तपत्राच्या कार्यालयात गेलो होतो. तिथे काही अनोळखी राजकीय मंडळी बसली होती. माझ्या छातीवरचा बिल्ला बघून चर्चेला तोंड फुटले. तसा हा नेहमीचाच प्रकार आहे. बिल्ला बघितल्याबरोबर काही विशिष्ट लोकांच्या टाळक्यात प्रसुतीवेदनेच्या कळा उठायला लागतात आणि शेतकरी संघटना व शरद जोशी यांच्याविषयी काहीतरी खोचक वाक्य प्रसवल्याशिवाय त्यांचे मन काही शांत होत नाही. लालबिल्लेवालेसुद्धा शरद जोशी नावाच्या जागतिक दर्जाच्या विद्यापीठाचे विद्यार्थी असल्याने तितक्याच ताकदीने त्यांचे वार परतवून लावत असतात. विषय आर्थिक असो की सामाजिक, मुद्दा धोरणात्मक असो की तार्किक, शेतकरी संघटनेच्या पाईकाजवळ शेतीच्या अर्थकारणाची जेवढी खोलवर जाणीव आहे तेवढी क्वचितच कुणाकडे असेल. चार वर्ग शिकलेले शेतकरी संघटनेचे पाईक मोठमोठ्या अर्थतज्ज्ञांना निरुत्तर करू शकतात, हे जवळजवळ सर्वमान्य झाले आहे.

तर झाले असे की, चर्चेला सुरुवात झाली. खरं तर या चर्चेला चर्चे पेक्षा वादविवाद स्पर्धेचे नाव देणे अधिक योग्य राहील. केंद्रसरकारची धोरणं कशी शेतकरी हिताची आहे, कापूस निर्यातबंदीचा निर्णय कसा ग्राहकांच्या हिताचा आहे, हे तो माझ्यावर बिंबवण्याचा प्रयत्न करीत होता; परंतु त्या समर्थनार्थ तो ज्या मुद्यांचा आधार घेत होता ते मुद्दे एवढे तकलादू होते की, माझ्या एकाच उत्तराने तो गारद व्हायचा. त्या उत्तरावर प्रतिप्रश्न करण्यासाठी त्याच्या जवळ काहीच उरत नसल्याने मग तो लगेच दुसरा मुद्दा पुढे रेटायचा. सरतेशेवटी केंद्रसरकारच्या धोरणांची बाजू घेऊन आपला टिकाव लागणार नाही हे लक्षात आल्यावर मग चक्क वैयक्तिक पातळीवर घसरणे आणि शरद जोशींवर टीका करणे ही बहुतेकांना सवयच असते तसाच तोही घसरला; पण इथेही त्याचा टिकाव काही लागला नाही. शेवटी युद्धात हार पत्करल्याच्या मानसिकतेने शस्त्र खाली ठेवावीत, अशा हावभावाने त्याने कान पाडले आणि चर्चा संपली.



गंगाधर मुटे

विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी चर्चा करावयाची असते. चर्चे तून जे सकस, चांगले, अधिक तार्किक असेल ते स्वीकारायचे असते. आपल्या मनातील अर्धवट किंवा कोणत्याही निष्कर्षाप्रत न पोचलेल्या विचारांना अधिक तर्कसंगत करण्यासाठी किंवा एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी चर्चा हे प्रात्यक्षिकासारखे माध्यम ठरू शकते. वादविवादातून आपण जोपासलेल्या विचारांची खोली पडताळण्याची संधी निर्माण होते. चर्चा ही समुद्रमंथनासारखी असते. प्रचंड समुद्रमंथनानंतर जे काही वीष किंवा अमृत निघेल तेव्हा त्यातील काय स्वीकारायचे आणि काय अव्हेरायचे, याचा विवेकाच्या आधाराने सारासार विचार करून मग त्यापुढील निर्णय घ्यायचे असतात.

परंतु दुर्दैवाने असे फारसे घडताना दिसत नाही. बहुतांश चर्चा एक तर जिंकण्याच्या, फड गाजवण्याच्या किंवा आपापले घोडे दामटण्याच्या उद्देशानेच केल्या जातात. विधान भवन आणि संसदही याला अपवाद नाही. एखाद्या विधेयकावर किंवा धोरणात्मक मसुद्यावर सांगोपांग चर्चा झाली आणि त्या चर्चेला अनुरूप असे धोरण आखले गेले, असेही फारसे घडत नाही. संसदेतील चर्चा रंगणे म्हणजे आखाड्यात दोन पहिलवानांची कुस्ती रंगावी, अशासारखाच प्रकार असतो. सत्ताधारी पक्ष एका बाजूने तर विरोधी पक्ष दुसऱ्या बाजूने तावातावाने आपापले घोडे दामटत असतात. त्यात विषयाचे मूळ गांभीर्य कुठेच दिसत नाही किंवा उकल करण्याच्या उद्देशाने मुद्देसूद उहापोह होत आहे, असेही दिसत नाही. चर्चे च्या माध्यमातून एखादा जटील किंवा सर्वसामान्य जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न मार्गी लागला आहे, असे फारसे कधीच घडत नाही आणि मग,

**झाले अता पुरेसे, ते बोलले बहू**
**बाळंत होत ना ती, चर्चा झडू नये**

असे म्हणायची वेळ येते.

त्या दिवशी माझ्यावरही तीच वेळ आली होती. त्यामुळे मी केवळ उत्तरे तेवढे देत होतो. तो निरुत्तर होत असला तरी

त्याला मात्र माझे म्हणणे पटवून घ्यायचेच नव्हते. त्याला त्याचे विचार, चर्चेच्या नावाखाली माझ्यावर लादायचे होते. विषय शेती आणि शेतकरी असला तरी शेतीचे बरे किंवा वाईट यापैकी काहीतरी व्हावे हा त्याचा उद्देशच नव्हता, केवळ मला हरवून जिंकायच्या ईर्ष्येनेच तो तावातावाने माझ्यावर तुटून पडत होता.

फळाच्या अपेक्षेने केलेले कर्म म्हणजे सकाम कर्म आणि फळाची अपेक्षा न बाळगता केलेले कर्म म्हणजे निष्काम कर्म. भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीतेत दोनच कर्मयोग सांगितलेत; पण काही माणसं अशीही असतात की कुठल्याही स्थितीत फळ मिळताच कामा नये, असा पक्का निर्धार करूनच कर्म करतात त्याला कोणता कर्मयोग म्हणावे, याचा उलगडा बहुतेक भगवान श्रीकृष्णालासुद्धा झाला नसावा, म्हणून तर त्याने एवढी मोठी गीता कथन करूनही त्यात अशा कर्मयोग्याबद्दल अवाक्षरसुद्धा उच्चारले नाही.

वृत्तपत्राच्या कार्यालयातील माझे काम आटोपून मी जेव्हा बाहेर पडत होतो. तेव्हा त्याने परत एकदा उचल खाल्ली अन् म्हणाला, तू शरद जोशींचा आंधळा समर्थक आहेस. मी मागे वळून पाहिले, स्मित केले, अन पुढे निघून आलो.

शरद जोशींचे शिष्य, बगलबच्चे, पित्तू, चमचे ही विशेषणे संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी कुणी ना कुणी यापूर्वी वापरलेलीच आहेत. शेतकरी संघटनेचा मी पाईक आहे, हे प्रत्येक कार्यकर्ता अभिमानाने सांगतच असतो; पण आंधळा समर्थक हे विशेषण माझ्यासाठी नवीन होते. शेतकरी संघटनेच्या विचारांवर माझी श्रद्धा आहे, शरद जोशींनी दिलेल्या शेतमालास उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव या एककलमी कार्यक्रमाचा मी समर्थक आहे. मात्र डोळस समर्थक, की आंधळा समर्थक, याचा मी कधी विचारच केला नव्हता. गावाच्या गरिबीचे शाळेतील गुरुजनांनी सांगितलेले कारण, महाविद्यालयात प्राध्यापकांनी आणि लायब्ररीतील पुस्तकांनी वर्णन केलेले कारण यापेक्षा शरद जोशींनी सांगितलेले कारण हे अधिक प्रामाणिक, तर्कशुद्ध आणि वास्तवाच्या जवळ जाणारे असल्याने ते मला पटले होते. याच कारणाने मी अल्पवयातच शेतकरी संघटनेकडे खेचल्या गेलो, हे मला माहीत होते. तरीही मी आंधळा समर्थक तर नाही ना? या विचाराने मला ग्रासायला सुरुवात केली होती. श्रद्धा की अंधश्रद्धा, आंधळा समर्थक की डोळस समर्थक हे सिद्ध करण्यासाठी काही शास्त्रशुद्ध फूटपट्ट्याही उपलब्ध नाहीत. आपापल्या सोयीनुसार, कुवतीनुसार व आकलनशक्तीनुसार प्रत्येक जण यासंबंधात वेगवेगळ्या फूटपट्ट्या ठरवीत असतो. या फूटपट्ट्यांचे निकषही व्यक्तीसापेक्ष किंवा समूहसापेक्ष असतात. त्यामुळे या अशास्त्रीय फूटपट्ट्यांनी माझ्या गोंधळात आणखीच भर घातली. मग त्या रात्री काही केल्या झोपच येईना.

आणि अचानकच मला एक फूटपट्टी गवसली. आंधळे की डोळस याचा हमखास निकाल लावून देणारे सूत्र गवसले.

गेल्या तीस-बत्तीस वर्षांतील शेतकरी संघटनेची वाटचाल ही एकखांबी तंबूसारखीच राहिली आहे. शेतकरी संघटना म्हणजे शरद जोशी आणि शरद जोशींचे विचार म्हणजेच शेतकरी संघटनेचे विचार. जेव्हा जेव्हा शेतकरी संघटनेला राजकीय स्वरूपाचे किंवा अत्यंत महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घ्यायची वेळ आली तेव्हा तेव्हा शेतकरी संघटनेने अधिवेशन बोलावून खुलेपणाने चर्चा घडवून आणली. अधिवेशनाच्या पहिल्याच सत्रात शरद जोशींनी बीजभाषण करायचे आणि मग त्यावर प्रतिनिधींनी चर्चा करायची. शरद जोशींनी केलेले बीजभाषण शेतकरी प्रतिनिधींना खूप रुचायचे, शरद जोशींच्या शब्दांमध्ये शेतीची दशा पालटवण्याचे सामर्थ्य दिसायचे आणि मग त्या बीजभाषणाला एवढे समर्थन मिळायचे, की शरद जोशींचे वाक्य हेच ब्रह्मवाक्य ठरायचे. शेतकरी संघटनेच्या पहिल्या/दुसऱ्या फळीतील काही नेते मंडळी वेगळाच किंवा अगदीच उलट सूर काढायचीत; पण त्याला अजिबातच समर्थन न मिळाल्याने ते मुद्दे आपोआपच बाजूला पडायचे. विचार शरद जोशींचेच पण त्याला लोकमान्यता मिळाल्याने ते विचार शेतकरी संघटनेचे विचार ठरायचे. महत्त्वाचे निर्णय शरद जोशींचेच असले तरी ते अधिवेशनाच्या माध्यमातन जनमान्यता पावल्याने त्याला लोकशाही प्रक्रियेचे अधिष्ठान प्राप्त व्हायचे आणि म्हणूनच अधिवेशनात घेतलेले सर्व निर्णय शेतकरी संघटनेच्या पाईकांनीच घेतले होते, असे म्हणावे लागेल.

आंधळे की डोळस याचा हमखास निकाल लावून देणारे मला गवसलेले सूत्र असे की, आजपर्यंतच्या शेतकरी संघटनेच्या प्रवासात जेवढे काही निर्णय घ्यायची वेळ आली आणि निर्णय घेतले गेले, ते निर्णय जर मला अजिबात चुकीचे वाटत नसेल किंवा योग्यच वाटत असेल तर मला ते योग्यच का वाटतात, याचा शोध घेणे गरजेचे ठरते. ते मला मनोमन पटले म्हणून मी समर्थन केले, की केवळ शरद जोशींवर नितांत श्रद्धा आहे म्हणून मी डोळे मिटून समर्थन केले? याचा जर शोध घ्यायचा असेल तर शरद जोशी ऐवजी जर मी असतो तर काय निर्णय घेतले असते, असा विचार करून शक्यता पडताळून पाहणे यापेक्षा अधिक चांगला दुसरा मार्ग असू शकत नाही. मी जेव्हा असा विचार करतो तेव्हा असे दिसते की, अनेक निर्णय मी तसेच घेतले असते, जसे शरद जोशींनी घेतले आहेत. त्यात मला आजवर कुठलाच विरोधाभास आढळला नाही. मला असा एकही निर्णय दिसत नाही की येथे शरद जोशींचे चुकले असे मी म्हणू शकेन. मात्र असे काही निर्णय आहेत की, मी अगदी त्याच्या उलट निर्णय घेतले असते, असे मला वाटते. जसे की, जर अभ्यास आणि आकलन शक्तीच्या बळावर निर्णय घ्यायची माझ्यावर निर्णय घ्यायची वेळ आली असती तर मी डंकेल प्रस्तावाला, गॅट कराराला, बिटी तंत्रज्ञानाला, मुक्तअर्थव्यवस्थेला कडाडून विरोध केला असता.

मी नक्की असेच केले असते कारण की मी आयुष्यातले १६-१७ वर्षे शाळा-कॉलेजात शिक्षण घेण्यात खर्ची घालवले, अवांतर साहित्याची पुस्तके वाचून डोळेफोड केली, पुढाऱ्यांची भाषणे मन लावून कानात तेल ओतून ऐकलीत; त्या बदल्यात या सर्वांनी मिळून त्यांना ऐदीने जीवन जगता यावे यासाठी शेतीला लुटून आपापले ऐश्वर्य वाढविण्यासाठी त्यांचा एक हस्तक/दलाल म्हणून मला घडविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला होता. सरकार हे शेतकऱ्यांसाठी मायबाप असते व व्यापारी मात्र लुटारू असून ते पावलोपावली शेतकऱ्यांची लूट करतात, असेच माझ्या मनावर ठसविण्यात या शिक्षणप्रणालीने कुठलीच कसर बाकी ठेवली नव्हती. शरद जोशी जर भारतात आले नसते आणि या शेतीच्या लुटीच्या रहस्याचा सप्रमाण भेद जर शेतकरी समाजासमोर खुला केला नसता तर आमच्यासारख्या शेतकरीपुत्रांना मुक्तअर्थव्यवस्थेतच शेतकऱ्यांचे हित आहे हे कधी कळलेच नसते.

शेतकरी संघटनेचा विचार कानात पडला आणि माझ्या आयुष्याची दिशा बदलली. हे गमक ज्या क्षणी मला कळले त्याच क्षणी मुखातून शब्द बाहेर पडले होते,

**सरकारच्या धोरणापायी, छक्के-पंजे आटले**
**बरं झालं देवाबाप्पा, शरद जोशी भेटले**

संघटना शेतकऱ्यांची असली तरी या संघटनेचा विचार केवळ शेतकऱ्यांचे हित साधण्यापुरताच मर्यादित नाही. शेतकरी संघटनेने देश वाचविण्याचा विचार मांडला आहे. हा विचार म्हणजे अनेक तुकडे एकत्र करून बांधलेल्या गोधड्यांचे गाठोडे नसून एकाच धाग्याने विणलेले महावस्त्र आहे. बेरोजगारीपासून महागाईपर्यंत सर्व समस्यांचे निराकरण करण्याची ताकद या विचारसरणीत आहे. संघटनेचा विचार म्हणजे एक मार्ग आहे. ज्याला ज्याला संघटना कळली त्या सर्वांची वाटचाल ह्याच मार्गावरून व्हायला हवी. विचारधारेतच दिशानिर्देशन करायचे सामर्थ्य असेल तर त्या विचाराशी बांधिलकी जोपासणारे एकाच मार्गाने जात आहे, असे म्हणावे लागेल. त्यात कुणी कुणाचे अंधानुकरण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

१९८० च्या सुमारास संघटना, चळवळ आणि संप-आंदोलनाचे पेवच फुटले होते. शिक्षकांचा संप, कामगारांचा संप, आसामचे आंदोलन, कर्मचाऱ्यांच्या संघटना, हमालांच्या संघटना, उग्रवादी चळवळीमध्ये बोडोलँड, नागालँड, काश्मीर, खलिस्तान वगैरे... कुणाच्याच पदरात काहीच न पडताच या सर्व चळवळी संपून गेल्यात. फक्त शेतकरी संघटनाच एवढा प्रचंड काळ टिकून आहे त्याचे कारण विचारांची ताकद हेच आहे. शरद जोशी नावाचा विचार शेतकऱ्याच्या घराघरात पोहोचला आहे. शेतीतील दारिद्र्याचा नायनाट करण्याची क्षमता केवळ शरद जोशींनी दाखविलेल्या मार्गात आहे, याची सर्वांना खात्री पटली आहे.

मुक्तअर्थव्यवस्थेचा पुरस्कार करण्यासाठी जेव्हा या देशातले मोठमोठे उद्योगपती, नामवंत अर्थशास्त्रज्ञ, अर्थशास्त्राचे प्राध्यापक जेव्हा कचखाऊ वृत्ती बाळगून आहे, तेव्हा या देशातला अनपढ-अनाडी शेतकरी मात्र मुक्तअर्थव्यवस्थेच्या बाजूने खंबीरपणे उभा ठाकला आहे. जे भल्याभल्यांना समजत नाही ते अर्थशास्त्र शेतकऱ्यांना कळलेले आहे आणि हा चमत्कार शरद जोशी नावाच्या वादळाने घडवून आणला आहे.

अडीच तपाएवढा प्रदीर्घ काळ कोटी कोटी शेतकऱ्यांच्या हृदयात अनभिषिक्त अधिराज्य गाजवणारे वादळ ३ सप्टेंबरला वयाच्या ७६ व्या टप्प्यात पदार्पण करीत आहे, त्यानिमित्ताने त्यांना उदंड आयुष्य लाभावे म्हणून समस्त शेतकरी बांधवातर्फे माझ्या त्यांना लाख लाख शुभेच्छा...!

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

# स्वाहाकारी सहकारावर परिसंवाद

**विषय : कॅगने केलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या ऑडीटमधून दिसलेल्या भ्रष्टाचारावरती चर्चा**

■

प्रमुख वक्ते
**अशोक कुलकर्णी**
**वामनराव चटप** (अध्यक्ष स्व.भा.प.)
**रवि देवांग** (अध्यक्ष शे. सं)

■

निमंत्रक
**संजय कोले** (अध्यक्ष – शेतकरी संघटना युवा आघाडी)
**अनिल घनवट** (माजी अध्यक्ष – शेतकरी संघटना युवा आघाडी)

■

संपर्क
**शीतल राजोबा मो. ९४२१२२५६७१**

■

**बुधवार दि. २४ ऑगस्ट २०११ दुपारी २.०० वाजता**

**स्थळ : मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, पटेल चौक, सांगली.**

*सहकारी भस्मासूरापासून शेतकऱ्यांना कोण वाचवणार?*

# हमें क्या चाहिये?

## लोकोपकारी पूंजीपती या भ्रष्ट राजनेता, अफसर

**उद्योगपतियों और नेताओं के समृद्धि संचित करने के तरीके भी अलग अलग होते है. जहाँ उद्योगपति की समृद्धि प्रतियोगी बाजार से आती है वहीं नेताओं की समृद्धि एकाधिकार युक्त प्रतिगामी सत्ता और कानूनों से आती है. आप उद्योगपतियों को बाजार में मिटते हुये देख सकते है. वे आसानी से जगह खाली करने के लिये उनके ही प्रतिस्पर्धियों द्वारा मजबूर किये जा सकते है. जबकि नेताओं को हर देश में ताकत बंदूकों या चुनावों से हासील होती हैं. ज्यादातर चुनाव, किये गये कामों से ज्यादा क्षुद्र अस्मिताओं के उपर लड़े जाते हैं. इसलिये जहाँ उद्योगपति समाज को जोड़ते हुये पाये जाते हैं वहीं नेता या अफसर समाज को बाँटते हुये ही मिलेंगे.**

कुछ ही दिन पहले अमेरिका से एक खबर आयी कि वहाँ के सबसे धनवान निवेशक वारेन बुफेट ने बिल गेटस् फांऊडेशन को कोई ३१ बिलीयन डालर दान में दिये. प्रसिद्ध उद्योगपति राकफेलर ने आज से एक शतक पहले अपनी समूची जायदाद लाकोपयोगी कामों के लिये समर्पित कर दी थी. दुनिया का सबसे महान नर्तक माइकल जैक्सन तो एक महान दानी था ही. इधर हमारे देश में भी विप्रो के प्रमुख अजीम प्रेमजी ने कोई २ बिलीयन डॉलर, अर्थात लगभग ९ हजार करोड़ रूपये, देश के शैक्षणिक कामों के लिये अपने ही नाम से बनाये अजीम प्रेमजी फाँऊडेशन को दान में दे दिये. उद्योगपति जब दान कर रहे हो तो संत कैसे पिछे रहते. दक्षिण भारत के प्रसिद्ध आध्यात्मिक संत स्व. सत्य श्रीसाईबाबा ने आंध्रप्रदेश, कर्नाटक और तमिलनाडु की सरकारों को जलपूर्ति की व्यवस्था और राज्यों के शैक्षणिक विकास के लिये अरबों रूपये दान में दे दिये. उनके लोकोपयोगी कामों से प्रभावित होकर तमिलनाडु के भूतपूर्व मुख्यमंत्री करूणानिधी जैसे नास्तिक भी उनके भक्त हो गये. आप किसी भी शहर का दौरा लगाकर आ जाईये. शहर के सबसे बड़े मंदिर, धर्मशालायें, स्कूल, समाज भवन या पुस्तकालयों के सामने आपको उन्हीं लोगों के नाम मिलेंगे जिन्होंने पहले तो पैसा कमाने के लिये जी तोड़ मेहनत की, दूर देशों की यात्राएँ की, अपने प्रतिस्पर्धियों से निपटने के लिये सभी चालाकियाँ की और बाद में अपनी हासिल संपत्ति का एक बड़ा हिस्सा दान में दे दिया. जितनी खुशी से उन्होंने पैसा कमाया, उससे दुगुनी खुशी से उसे त्याग भी दिया.

ऐसे में एक प्रश्न खड़ा होता है कि हम पैसा क्यों कमाना चाहते है? हम समृद्धि के शिखर क्यों छूना चाहते है? हम सब कुछ त्याग कर इस नश्वर जगत में प्रसिद्ध क्यों होना चाहते है? हमारी अमरत्व की कामना क्या हमारे डीएनए का ही हिस्सा है या वह हमारा सांस्कृतिक मूल्य है? अमरत्व की इसी कामना के लिये कोई संगीतकार संगीत की नयी नयी धुनें रचता है तो कोई अभिनेता अनगिनत भूमिकाओं में स्वयं को प्रस्तुत करता है. कोई सचिन टेडुंलकर बीस सालों से अबाधित रूप से खेलते हुये नये नये विश्व रिकार्ड बनाता है तो कोई साहित्यिक जीवन के अनेकानेक अंगों और रसों में अपनी वाणी को अभिव्यक्त करता चाहता है. एक राजा नये नये क्षेत्र जीत कर अपने राज्य की सीमाओं को बढ़ाता है तो एक संत अपने ज्ञान, विवेक और प्रेम से अपने कृपाभिलाषी भक्तों की संख्या बढ़ाता है.

ईश्वर तो हमें बस एक बूँद के रूप में भेज देता है किंतु हम है कि एक महासागर की तरह फिर से उसमें विलीन होना चाहते हैं. उसने हमें एक बीज के रूप में भेजा था, हम किसी विराट जंगल की तरह उसे पाना चाहते हैं. विस्तार की हद तक विस्तार करते हुये बिखर जाना और सदा के लिये आनेवाले वक्त की स्मृतियों का हिस्सा बन जाना, अनादि अनंत कालों से मानवीय विकास की सबसे महान प्रेरणा रही है. हमारा प्रेम हमारे विस्तार को सहारा, प्रेरणा या दिशा देता है, इसीलिये हम प्रेम करते है, अन्यथा हम प्रेम भी क्यों करते? हम विस्तारित होने के लिये प्रेम करते है या प्रेम करने के लिये विस्तारित होते है, यह प्रश्न अपने आप से पूछिये. एक ही उत्तर मिलेगा, हमारे विस्तार के लिये प्रेम जरूरी है. प्रेम तो वह रथ है जिसमें बैठ कर हम जाना तो कहीं और चाहते है. हमारा प्रेम हमारी यात्रा को चिरस्मरणीय बना देता है, इसीलिये हम प्रेम पाना चाहते है और प्रेम देना चाहते है. किंतु मूलभूत प्रेरणा तो अपनी सीमाएँ दसों दिशाओं में बढ़ाने की ही होती है. हम भाषा, क्षेत्र, जाति या देशों की सीमाओं को लांघकर फैलना चाहते है. नये दोस्तों से हाथ मिलाना या नये प्रतिस्पर्धियों से दो हाथ करना चाहते है. और फिर, विजय के चरम बिंदु पर हमने जो कुछ भी हासिल किया है, उससे मुक्त हो जाना चाहते है. हम स्वयं को बार बार रिक्त कर देते है ताकि नयी



ॲड. दिनेश शर्मा

उर्जा के लिये अपना पात्र खाली रह सके. पुराने जमाने के ऐसे कई राजाओं के किस्से आपको पुराणों में मिल जायेंगे, जिन्होंने पहले तो अश्वमेध यज्ञ के द्वारा अपने राज्य का विस्तार किया और फिर उसी यज्ञ की समाप्ति पर अपनी सारी संपदा दान में देकर फिर से रिक्त हो गये. फैलना और फिर रिक्त हो जाना, हमारे जीवन को सदा के लिये तरोताजा उर्जावान बनाकर रखनेवाला टॉनिक रहा है. अनादि अनंत कालों से मानवता इसी तरह से जिंदा रही है. जो फैलता नहीं है वह तो नष्ट होता ही है किंतु जो रिक्त नहीं होता है, वह भी अपने ही बोझ से चरमरा जाता है. जिंदगीं को अभावों ने जितना समृद्ध किया है, रिक्तताओं ने जितना भरा है, उतना मुफ्त का खिलाने से या समानता के नारे ने नहीं किया है. भारत के ब्राह्मणों को तो सदा से बनियों के घर से अनाज मुफ्त मिलता रहा किंतु इससे कभी उनकी गरीबी दूर नहीं हुयी. दरिद्र सुदामा केवल कृष्ण के जमाने की ही वास्तविकता नहीं थी बल्कि हर युग की वास्तविकता रही है और रहेगी.

जनता की गरीबी दूर करने के लिये दुनिया के कई देशों में कल्याणकारी राज्य की स्थापना पर जोर दिया और पैसा कमाने के सभी नीजि प्रयासों को हतोत्साहित किया गया. किसी उद्योगपति के सीमातीत विस्तार को राष्ट्रविरोधी कृत्य माना गया. हमारे भूतपूर्व प्रधानमंत्री जवाहर लाल नेहरू तो लाभ की संकल्पना से ही घृणा करते रहे और नीजि उद्यमों को दुनिया भर के लायसेंस, कोटा और इंस्पेक्टरों के जाल में जकड़ने में अग्रगामी बने रहे. उन्होंने उद्योगपतियों के उपर ज्यादा से ज्यादा कर लगाकर जमा रकम से सरकारी उद्यमों की स्थापना की और उन्हें देश के नये तीर्थ कहा. उनकी कन्या इंदिराजी ने उनके विचारों को आगे बढ़ाने में उनसे भी ज्यादा कट्टरता का परिचय दिया और सभी नीजि बैंकों का राष्ट्रीयकरण कर दिया. परिवहन, उर्जा निर्मिती, शिक्षा, संचार और आधारभूत संरचना के क्षेत्र में व्यक्तिगत निवेश के लिये कोई जगह ही नहीं रखी गयी. व्यक्ति यह समाज या राष्ट्र के विरूद्ध है, इसी बात को सत्य मानते हुये व्यक्ति के फैलाव या विस्तार को कुंठित करने में कोई कसर बाकी नहीं रखी गयी. नतीजतन यह देश केवल चालीस सालों में प्रतिभा और प्रयासों से कंगाल हो गया. जिनमें फैलने का सामर्थ्य था, उनके कदमों में जंजीरें थी और मुफ्त का माल खिलाने वाली सरकारी योजनाओं ने हर गाँव में सुदामा प्रवृति के लोगों के समूह बना दिये. सुदामा इसलिये नहीं फैला कि उसे मुफ्त का माल मिल रहा था और कृष्ण इसलिये नहीं फैला कि उसके द्वारका से बाहर जाने पर पाबंदी थी. नतीजतन पैसे वाले अपने पैसे छिपाने लगे और दरिद्र रेखा के नीचे जाना सम्मान का सूचक बन गया. दानशूरता बीते जमाने की बात हो गयी और दिवालिया होना शर्म की बात नहीं रही. जो काला धन ब्रिटीश सत्ता में कहीं नहीं था वही आजादी के बाद हमारी अर्थनीति और राजनीति को नियंत्रित करनेवाली सबसे निर्णायक शक्ति बन गया. नतीजा बेहद दारूण रहा. हिंदुस्थान की प्रतिभा को जितना नुकसान मुगलों या अंग्रेजो की सामूहिक सत्ता ने नहीं पहुँचाया, उतना नुकसान नेहरू और इंदिरा की अर्थनीति ने पहुँचा दिया. ये दोनों नेता व्यक्तिगत रूप से बेहद ईमानदार थे. इनके विरोधी भी इनका सम्मान करते थे. नेहरू जहाँ हमारे स्वाधिनता समर के लोकप्रिय नेता और बेमिसाल लेखक थे वहीं इंदिराजी बेहद बहादुर नेता थी और विश्व राजनीति में अपना रूतबा रखती थी. किंतु प्रत्येक मनुष्य में अंतर्भूत विस्तार की ईश्वरीय प्रेरणा का ही गला घोंट देने की अपनी नीतियों के कारण, वे दोनों, उनको मिले स्वर्णिम अवसर को तबाह कर देने के अपराधी माने गये.

उद्योगपति गरीबों को लूटकर धनवान बनते है यह केवल एक मिथक है, सच्चाई नहीं है. वास्तव में प्रत्येक उद्योगपति अपने दौर की वस्तु या सेवा से जुड़ी किसी न किसी आवश्यकता को बाजार में प्रचलित कीमत से कम कीमत पर उपलब्ध करा कर ही पैसा बनाता है. यदि वह पहले से उपलब्ध सेवा या वस्तु को ज्यादा कीमत पर बेचेगा तो उसे कौन खड़ा करेगा? इसलिये वह प्रतियोगी मूल्य पर अपने उत्पाद प्रस्तुत करता है. इसके लिये वह नयी टेक्नालॉजी का उपयोग करके अपने उत्पाद का उत्पादन और विपणन खर्च कम करता है और सस्ती से सस्ती दरों पर अपने उत्पाद बाजार में प्रस्तुत करता है. अपने इस प्रयास में वह दो तरह से समाज को समृद्ध करता है. एक तरफ तो वह नये रोजगार निर्मित करता है वहीं दूसरी ओर वह अपने उत्पाद खरीदने वालों की कुल बचत को बड़ा कर उन्हें दूसरी वस्तुओं या सेवाओं को खरीदने का अवसर देता है. नतीजतन बाजार में वस्तु की कुल माँग बड़ती रहती है और सभी समृद्ध होते रहते है. उसका मुकाबला कहीं भी उस गरीब से नहीं है जिसको बचाने के लिये सारी सरकारी मशिनरी या नेता खड़े है. उद्योगपति का मुकाबला तो किसी जमे जमाये पुराने उद्योगपति से ही होता है. सारी सरकारी मशिनरी गरीब को बचाने का नारा लगाती है पर बचाती तो वह उस पुराने उद्योगपति को ही है.

दुनिया के जिस जिस देश में सरकारों की कल्याणकारी योजनायें हावी रही है, वहाँ वहाँ पर पुराने उद्यमों को बचाने के लिये नये उद्यमों के लिये दरवाजे बंद कर दिये गये. पुरानेपन के एकाधिकार को सरकारी समर्थन दिया गया. लोगों को मँहगी कीमतों पर वस्तु या सेवा खरीदने के लिये मजबूर कर दिया गया. गरीबों को नयी टेक्नालॉजी से होनेवाली संभावित बचत से इस उल्टे तरीके से वंचित कर दिया गया. और यह सभी कुछ उनको बचाने के नाम पर किया गया. इसलिये इस बात में कोई दम ही नहीं है कि आजादी के बाद गरीब और गरीब और अमीर और अमीर होते चले गये. जिसतरह सचित टेंडूलकर के रिकार्ड में जुडनेवाला कोई भी नया रन किसी दूसरे के हिस्से का रन नहीं होता, जिसतरह अमिताभ बच्चन का प्रत्येक नया रोल या भूमिका किसी दूसरे का शोषण करने से नहीं जन्मती, जिसतरह स्वर साम्राज्ञी लता मंगेशकर का प्रत्येक नया गीत केवल उन्हीं को ध्यान में रखकर लिखा जाता है, जिसतरह किसी नेता के बहुत ज्यादा वोट से जीतने से किसी देश का नुकसान नहीं होता, और जिसतरह किसी साहित्यकार के बहुत ज्यादा साहित्य रच देने से बाकी के लेखकों का कोई नुकसान नहीं होता है, बस ऐसे ही, किसी भी उद्योगपति के द्वारा कमाये गये प्रत्येक नये पैसे से किसी गरीब का कोई लेना देना ही नहीं है. जो भी आपको ऐसा कहता है वही असली डकैत है. वह गरीब का नाम लेकर, उनके समूह बना बनाकर, उनको एक ऐसे भ्रमजाल में जकड़ लेता है, जिससे उन्हें पिढ़ीयों से मुक्ति नहीं मिल पायी हैं. यही लोग मानवीय प्रतिभा के सबसे बड़े दुश्मन हैं, यही लोग अनादि अनंत चक्रों में चलनेवाले गरीबों के शोषण के शिल्पकार हैं. जहाँ जहाँ कल्याणकारी राज्य का नाटक चला, वहाँ वहाँ पर जनता, गरीब और गरीब होती चली गयी और उद्योगपति समाप्त होते चले गये. वहाँ पर केवल नेता, तस्कर और

अफसर ही धनवान से धनवान होते पाये गये हैं. यही कहानी भारत की है, यही सोव्हित रूस, वियतनाम, बर्मा, कंबोडिया, क्यूबा, पौलेंड, चीन या उत्तरी कोरिया की है. जिस किसी व्यवस्था ने मानवीय विस्तार की कामना को कुंठित किया है, उसने वास्तव में मानवता के साथ में सबसे बड़ा विश्‍वासघात किया है.

महान और धनवान उद्योगपति किसी भी समाज की समृद्धि को बढ़ाते है. वे न केवल स्वयं धनवान बनते है बल्कि अपने समूचे दौर को उपर उठने में सहयोग करते है. वे टेक्नालॉजी को बढ़ावा देते है, वे नये रोजगार का सृजन करते है, वे हमारी कुल बचत को बढ़ाते है और अंत में अपनी समूची समृद्धि को उसी समाज पर लुटा देते है, जिसमें उन्होंने उसे कमाया था. वे उन मधुमख्खियों की तरह होते है जो सारी दुनिया में घूम घूम कर फूलों से पराग चुनती है, बेहतरीन कुशलता से उस शहद को बचाने के लिये छाते का निमार्ण करती है, उसमें अपनी समृद्धि का संचय करती है और अंत में उसे लुटाकर, रिक्त करके किसी नये उद्यम की तैयारी में लग जाती है. ये उद्योगपति निश्‍चित रूप से उन समाजवादी नेताओं या सरकारी अफसरों की तरह तो नहीं ही होते है जो छिप कर पैसे कमाते है, भष्ट्र आचरण के द्वारा समाज के पैसे को अपनी ओर खींचते है, व्यवस्था को दूषित करते हैं, अपने दौर को भष्ट्र करते है और अंत में उस सारी समृद्धि को कहीं छिपाकर दुनिया से रवाना हो जाते है. ऐसे लोग न केवल स्वयं की प्रतिभा का गलत इस्तेमाल करते है बल्कि देश या समाज को एक ऐसे युद्ध में झौंक देते हैं, जिसमें जीतने के लिये सभी नीचताएँ की जाती है, जहाँ क्षुद्रता नियम बन जाती है, चापलूसी कानून बन जाती है और जहाँ दिव्यता या भव्यता की कोई संभावना शेष नहीं रह पाती है. इस दुनिया को जितना नुकसान महामारियों या युद्धों में नहीं हुआ है उससे ज्यादा नुकसान नेताओं या सरकारी अफसरों के भष्ट्र दुष्कृत्यों से हुआ है. ऐसा नहीं है कि समाजवाद ने ईमानदार नेता पैदा ही नहीं किये हो. किंतु बेचारे इन अभागे गिने चुने ईमानदार नेताओं को उनके ही भष्ट्र अनुयाईयों या वंशजों ने बाजु में धकिया कर वास्तविक सत्ता को अपने हाथ में ले लेने के कई उदाहरण विश्‍व इतिहास में भरे पड़े मिलते हैं.

उद्योगपतियों और नेताओं के समृद्धि संचित करने के तरीके भी अलग अलग होते है. जहाँ उद्योगपति की समृद्धि प्रतियोगी बाजार से आती है वहीं नेताओं की समृद्धि एकाधिकार युक्त प्रतिगामी सत्ता और कानूनों से आती है. आप उद्योगपतियों को बाजार में मिटते हुये देख सकते है. वे आसानी से जगह खाली करने के लिये उनके ही प्रतिस्पर्धियों द्वारा मजबूर किये जा सकते है. जबकि नेताओं को हर देश में ताकत बंदूकों या चुनावों से हासील होती हैं. ज्यादातर चुनाव, किये गये कामों से ज्यादा क्षुद्र अस्मिताओं के उपर लड़े जाते हैं. इसलिये जहाँ उद्योगपति समाज को जोड़ते हुये पाये जाते हैं वहीं नेता या अफसर समाज को बाँटते हुये ही मिलेंगे. आपको कोई उद्योगपति ऐसा नहीं मिलेगा जो भाषा, धर्म, राष्ट्र या जाति के नाम पर अपना उत्पाद बेचते मिलेगा. जबकि ऐसा नहीं करने वाला नेता ढूँढने से भी मिलना मुश्किल है. एक भष्ट्र उद्योगपति सिर्फ अपने व्यापार को डुबा सकता है किंतु एक भष्ट्र नेता एक समूची पिढ़ी के भविष्य को डुबा देता है. एक महान उद्योगपति अपने नये नये व्यापारों से समाज को समृद्ध करते हुये अपने देश के लिये गौरव के अनेकानेक क्षण उपलब्ध कराता है तो एक महान नेता ऐसा वातावरण पैदा कर देता है, जहाँ व्यापार, कला, विज्ञान और साहित्य अपनी चरम उँचाईयों को छूते हैं.

हमने काफी कुर्बानियों के बाद यह आजादी पायी है. दुर्भाग्य से आजादी के बाद का बेहद कीमती समय सरकारी सार्वजनिक उद्यमों को खड़ा करने में और फिर उन्हें बाजार की प्रतियोगी ताकतों से बचानें में हमने बर्बाद कर दिया है. हमने व्यक्ति के विस्तारवादी सपनों को रोकना चाहा और पैसा कमाने की भावना को राष्ट्रविरोधी माना. नतीजतन हम केवल और केवल बारंबार दरिद्र भारत की ही परिक्रमा करते रहे और जीवन के प्रत्येक क्षेत्र में हम अभावों, औसतता और असहनीयता का बीजारोपण करते रहें. हम समृद्धि से चिढ़ते रहे और परिणामस्वरूप समृद्धि हमें चिढ़ाती रही.

आज आजादी की ६४ वीं वर्षगांठ पर हम कुछ नये वादे नियति के साथ कर सकते है. हम हमारी राष्ट्रभूमि पर जन्मे प्रत्येक व्यक्ति के सपनों को पूर्ण रूप से विकसीत करने में सहायता का वादा कर सकते है. हम बेहतरीन से कुछ भी कम नहीं वाली सोच को अपने जीवन में उतार कर भारतीय जीवन के प्रत्येक अंग में एक विशीष्ट दिव्यता का संचार करा सकते है. हम हमारी भूमि को फिर एक बार गंधर्व, यक्ष और युगपुरूषों की लीलाभूमि बना सकते है. और निश्‍चित रूप से ऐसा केवल और केवल प्रत्येक मनुष्य के सीमातीत विस्तार को सम्मान और संरक्षण देने से ही संभव होगा. भारत को उसकी समस्याओं से निजात देने के लिये हमे आज लोकोपकारी पूंजीपतियों की सख्त जरूरत है और साथ साथ हमें जरूरत है उनको जन्म देनेवाली राजनीति की.


**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com


## दु:खद निधन



**कै. शामराव साहेबराव झांजुर्णे**

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील तडेगाव गावचे शेतकरी संघटनेचे धडाडीचे कार्यकर्ते कै. शामराव साहेबराव झांजुर्णे (अण्णा) यांचे अल्पशा आजराने शनिवार दि. ३०/७/२०११ रोजी निधन झाले. इ.स. २००० पासून ते संघटनेचे सक्रीय कार्यकर्ते होते. ऊस आंदोलनात त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. कोरेगाव तालुक्यात त्यांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. शेतकरी संघटना परिवार त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

# पाणीसाठे उद्ध्वस्त करा!

आजही खाती भाकर तुकडा...
जाऊन यांना तोडा उखडा ॥

भक्तांनो, हा आदेश मिळाला तो शस्त्र हाती आल्यावर अवसान येणाऱ्या मर्दांना अन् मग घडले काय की, भाकर तुकडा खाऊन, प्राण शिरावर घेऊन आजवर पुरुषार्थ दाखवणाऱ्या त्या मावळातील मावळ्यांना शस्त्र प्रचिती करून दाखवण्यात आली. या शस्त्रांमध्ये ज्या बंदुका होत्या त्या नेमक्या याचवेळी कोठेही खटका न अडकता झाडून गेल्या आणि दोन मावळे गारद झाले. खरे तर जे झाले ते बरेच झाले म्हणायला हवे. अँबी व्हॅली, सहारा सिटी अशा लावण्यपूर्ण वसाहती जिथे स्थिर होत आहेत, ज्या सुंदर परिसरात आता एकांताची सुफले मिळावीत म्हणून कार्यानुभवाच्या विकृत कार्यशाळा भरत आहेत तिथे निर्मळ, शेतकर्मी शेतकऱ्यांचा साधा रहिवासही नकोच होता. आजही तांदूळ, बाजरी, ज्वारी, नागली ही पिके आणि त्यांची धान्य खाणारी मंडळी म्हणजे अतिदारिद्र्याचे प्रतिकच की! खरे तर तळेगाव ते कामशेत हायवेवरची ही डावी बाजू आता वाममार्गाला लावण्यात आलेली आहे हे या पाण्याभोवती राहणाऱ्या साठेसारख्या शेतकऱ्याला कळलेच नव्हते. तरी बरे झाले त्याचे आडनाव साठे एवढेच होते, पाणीसाठे असते तर प्रतिकात्मक म्हणून पाणीसाठ्याला उद्ध्वस्त केले म्हणून मीडियावाल्यांनी धिंगाणा केला असता. खरे पाहिले तर काय गरज आहे आता असल्या खेड्यांची, जिथले शेतकरी आजही पारंपरिक शेती करत बसतात, रेव्ह पार्ट्या आयोजनासाठी स्वतःचे शेत वापरू देत नाहीत, बार्बेक्यूसाठी बोकडे भाजू देत नाहीत, ग्रामीण वातावरणात शहरी कन्यांना निसर्ग अनुभव म्हणून वस्त्रविरहीत होऊ देत नाहीत. हे तर काहीच नाही अशा नेचर अर्बन खेड्याच्या आजूबाजूला तर सुंदर मोटेल्स, धाबे, रेस्टोबार उभे असतात तेव्हा यांच्या स्वतःच्या दारिद्र्य सादरीकरणामुळे त्या आस्थापनांच्या कलेक्शनवर विपरीत परिणाम होतो हे ते ध्यानात घेतच नाहीत. हे सारे एकाबाजूला तर एकीकडे जेव्हा दारिद्र्याचे विराट दर्शन होत असते तेव्हाच तर कटीभोवती रोजच चक्री कीर्तन करण्यासाठी मजा येत असते. ही पार्श्वभूमी तपासली आणि जर अशा खेड्यात जर मोठा पाणीसाठा ऊर्फ जलाशय अथवा तलाव असला तर त्या पाण्याचा फायदा कधीही लगतच्या मोठ्या शहराला दिला पाहिजे असेच स्पष्ट पौराणिक मत मयसभा आणि प्रतिसृष्टी निर्माण करणाऱ्यांनी उद्ध्वस्त पुराणात लिहून ठेवलेले आहे. आज डोंगर उतारावरचे एखादे खेडे उद्ध्वस्त करून दाखवणे हे खरे अतिविकासाचे पहिले मॉडेल आहे हे आधी लक्षात घ्या, कारण...

**उतारावरचे खाऊन सारे**
**प्रातःविधीस्तव तलाव वापरे**



**शे.भ.प.** शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

**जीव-जिवाणू शहरी जाती**
**रोगांची मग साथ पसरती**
**असंख्य शहरी मरतील की होऽऽ**
**म्हणूनच यांचा जीवच घ्या होऽऽ**

आता उल्लेखलेल्या कवनातून आमच्या हितोपदेशाचा मतितार्थ ज्या फिलगुड शेतकऱ्यांना कळाला असेल त्यांना हे लक्षात आले असेल की, एकदा का शेती महानगराजवळ आली आणि एकदा का मोठा तलाव अशा खेड्यात असला आणि एकदा का त्या निसर्ग पसाऱ्यावर नियंत्रण पदाधिकाऱ्याची नजर पडली की, मग त्या उर्दूतल्या म्हणीची आठवण नाईलाजाने करावी लागते. जी म्हण सांगते की, 'गरीब की बिबी सबकी भाभी, नंगे को कपडा मांगेगा धोबी' ही म्हण खरी आहे की, नाही ते एकदा बघून घ्या कारण बंदिस्त जलवाहिनीची कल्पना का केल्या गेली तर त्या खेड्यातले ते पाणी दुषीत होऊ नये म्हणून आणि ती शक्यताही निर्माण होऊ नये म्हणून आधीच खेडे उद्ध्वस्त केले तर काहीही हरकत नाही हा उदात्त विचार जेव्हा त्या कोणत्याही कंट्रोलरच्या मनात आला तेव्हा मग त्याने गोळी आणि बंदुका देऊन टाकल्या. खरेतर ज्याने गोळी मारण्याचा आदेश दिला होता त्याला असे वाटले होते की, मुंबई वगळता इतर ठिकाणी कधीही, कोणलाही गोळी झाडण्याचा प्रसंग आलेला नाही, तेव्हा या गोळ्या झाडणाऱ्यांचा नेम शेतकऱ्यांच्या देहावर मुळीच बसणार नाही आणि संपूर्ण भारतात, कहीं पे निगाहे, कहीं पे निशाणा हा सिद्धांत जेव्हा मान्य आहे तेव्हा या गृहरक्षकांची निगाह जर शेतकऱ्यांवर पडली तर त्यांचा निशाणा हवेत आकाशाकडे राहील. हा हेतू तर उदात्त होता; पण उद्देश भाग सुस्पष्ट होता. त्यामुळे घडले काय की, या गृहमुषकांनी निगाहे आकाशाकडे ठेवली तर निशाणा शेतकऱ्यांवर लागला. हे सगळे घडणे म्हणजे नियतीच्या मनातले खरे ठरणे होते. कारण आपल्या मराठी भूमीला जो शतकानुशतके शाप आहे की, हातचे सोडून पळत्याच्या मागे इथली मंडळी धावतील, जो वारंवार वेगवेगळ्या भूभागांवर आपणच वसवलेल्या असंख्य पिशाच्चांनी सिद्ध करून दाखवलेला आहे. आजही आपल्यावर प्रेम करणारी आपली आई आपल्याला गावंढळ वाटते, कारण ती आयुष्यभर आपल्याला रखरखीत हातातून आपले भलेच चिंतीत असते, तसेच आपल्या काळ्या आईचे अर्थात भूमातेचेही झाले आहे. शहरीकरण नामक बाजारबसवी ही इतकी मनात घट्ट घुसली आहे की, आपले आप्त-सोयरे ज्या खेड्यात अर्थात आपल्या आईच्या सेवेत आहेत त्यांचा दुःस्वास वाटणे सुरू झाले आहे. हे वाटणे इतक्या पराकोटीला गेले आहे की, कदाचित उद्या आपल्याला आपला संसार चालवायचेही टेंडर द्यावे, घ्यावे लागेल की काय ही शंका येत आहे. ही शंका खरी ठरावी कारण आता खेड्यातले शांत, स्थिर, साधे आयुष्य कोणालाही नकोसे झाले आहे, सकाळी उठले

पान ३२ पाहा



भाग बारा

# गोदान

## मुन्शी प्रेमचंद

**अनुवादक - अनंत उमरीकर**

झुनिया घराकडे निघाली आणि गोबर द्विध मनःस्थितीत तिथेच उभा राहिला. मग एकाएकी धिक्कार होण्याच्या शक्यतेनं त्याच्या डोक्यात घर केलं. खरंच जर आई मारत तिच्या मागेच पडली तर? तो तर एकाच जागी चिकटल्यासारखा उभा राहिला. तो आणि त्याचं घर यांच्यात केवळ एक आंब्याची बागच होती. झुनियाची सावली हळूहळू घराकडे जाताना त्याला दिसली. आई झुनियाला शिवी देते आहे आणि त्याचे आवाज कानावर पडताहेत असा भास त्याला झाला. जसं काही कुणी डोक्यावर हातोड्याने मारतो आहे अशी अवस्था त्याची झाली. आपल्या अंगातलं सारं रक्तंच गोठून गेलं, की काय असं त्याला वाटायला लागलं. काही क्षणानंतर त्यानं पाहिलं धनिया घराबाहेर पडून कुठेतरी जातेय. वडिलाकडे जात असावी. कदाचित जेवण करून शेताकडे गेले असावेत. तेव्हा तोही शेताकडे निघाला. गहू आणि जवाच्या रानातून मागे भूत लागल्यागत तो पळत होता. तो वडिलांच्या मांडवा जवळ पोंचला आणि पाय वाजू न देता मांडवा मागे लपला. त्याचा तर्क बरोबर होता, त्याच्या मागूनंच धनिया बरोबर येऊन पोंचली. त्यांचं बोलण ऐकलं आणि आई एवढी कठोर होऊ शकते असं त्याला वाटलंही नाही. एका अनाथ मुलीची तिला एवढीही दया येऊ नये?

अशावेळी समोर येऊन मी जर काही बोललो तर आईची काय शान राहिल? बरं वडिल सुद्धा रागातंच आहेत, मी त्यांचा आदर करतो त्याचं हे फळ काय असे त्याला वाटायला लागलं. थोड्या वेळातंच दोघेही घराकडे परतायला निघाले. त्यांनी जर झुनियाला मारहाण केली तर आपण काही गप्प बसायचं नाही असं त्यानं ठरवलं आणि देवाकडे प्रार्थना केली. अशा काही संकटात आपण फसू असं त्याला कधी वाटलंही नव्हतं. झुनियाला आपल्याबद्दल काय वाटत असेल? आपण किती भित्रे, नीच, स्वार्थी आहोत असं वाटत असेल का? पण काही झालं तरी आई, दादा तिला कसं काय मारू शकणार आणि अशा परिस्थितीत घराबाहेर तरी कसं काढणार? घरात माझा हिस्सा नाही, की काय? जोपर्यंत आईबाप मुलांचं रक्षण करतात तोपर्यंतंच ते आई बाप आहेत; पण एकदा का त्यांच्यातलं ममत्व संपलं, की ते कशाचे आले आईबाप? अशा अनेक विचारांत तो आपली समजूत घालू लागला.

होरी मांडवापासून निघाला तसा गोबरही त्यांचा पिछा करतंच निघाला; पण घरातला उजेड दारात पाहून तो अंधारातंच थबकला. त्याला वाटलं बिचाऱ्या झुनियाला घरातले लोक रागावायला लागले आहेत आणि तो तर या बाबतीत काहीच करू शकत नाही. त्यानं सहजगत्या एक ठिणगी टाकली होती; पण ती ठिणगी आता पेट घेऊन सारं काही भस्मसात करील असं तर त्याला वाटलंही नव्हतं आणि आता तर त्याच्यात एवढी हिंमतही नव्हती, की समोर जाऊन म्हणावं, हो मीच टाकली आहे की ठिणगी. जया आधारावर तो विसंबून होता ते आधार असे कोसळताना पाहून तो तर खचून गेला आणि मागे परतला. आता झुनियाला तोंड कसं दाखवाव हाच प्रश्न त्याला पडला होता.

एखादा शिपाई रणांगणातून पळून जातो तसा शंभरेक पाऊल तो कसाबसा चालला. त्यानं लग्नासंबंधी झुनियाशी जे प्रेमालाप केले ते त्याला आता आठवायला लागले. त्याला ते प्रणयाचे सारे प्रसंग आठवले. ज्याक्षणी दोघांनी एकमेकांना आपलं सर्वस्व अर्पण केलं होतं आणि आता झुनिया एखाद्या विरहिणी प्रमाणे एकांतात सारे क्षण काटत होती. आता तिथे नराची उन्मत्त मनधरणी नव्हती. प्रेमिकांचे मधूर आवाज नव्हते; पण त्याबरोबरंच छळ कपटही नव्हतं. गोबरनं तिच्या घरट्यात शिरून तिला आनंद दिला, की नाही कुणास ठाऊक; पण तिला अडचणीत टाकलं एवढं मात्र निश्चित. त्यानं आता स्वतःला सावरलं. पळणाऱ्या शिपायानं आपल्या साथीदारासाठी परतावं तसा तो परतला.

परतून तो दाराशी आला. दार बंद होतं, दाराच्या फटीतून प्रकाश झिरपत होता. त्यानं फटीतून डोकावून पाहिलं. धनिया आणि झुनिया बसल्या होत्या. होरी उभा होता. झुनिया हुंदके देत होती आणि धनिया म्हणत होती, ''पोरी, तू बसून राहा. मी भोला काका आणि भावांना बघून घेते. आमच्या जीवात जीव आहे तो पावेतो कशाचीही काळजी करू नकोस. आम्ही असे तो तुझ्याकडे कुणाची डोळे तीरपे करून पाहण्याची सुद्धा हिंमत होणार नाही. गोबरचा गळा भरून आला. त्याला वाटलं आज जर शक्य असतं तर त्यानं आई-वडिलावर सोन्याचा वर्षाव केला असता आणि म्हणालो असतो, आता तुम्ही कष्ट न करता आरामात बसून खा आणि जे काय पूण्य, दान करायचं ते करा.'' झुनियाचं कसं होईल याबद्दल त्याच्या मनात आता काही शंका उरली नव्हती. तिला आश्रय मिळावा हीच तर त्याची इच्छा होती. ती आज पुरी झाली होती. झुनिया त्याला काय समजायचं ते समजू दे. जेव्हा पैशाच्या जोरावर साऱ्या गावाच तोंड बंद करायची ताकद येईल तेव्हाच तो परतणार होता. आई आणि दादा जेव्हा त्याला कुलकलंक न समजता कुलदीपक समजतील तेव्हा तो परतणार होता.

मनावरचा आघात जेवढा तीव्र तेवढीच त्यावरची प्रतिक्रियाही तीव्र. या

संकटामुळे त्याच्या हृदयातल्या प्रचंड अंतस्थ खळबळीतून आता पावेतो त्याच्या हृदयात लपून राहिलेला लाव्हा रस बाहेर पडला. आज प्रथमच त्याच्या जबाबदारीची त्याला जाणीव झाली आणि ती पार पाडण्याचा निश्चयही त्याने केला. कमीत कमी काम करणे आणि जास्तीत जास्त खाणे हा तर आपला हक्कच आहे असं तो आजपर्यंत समजायचा. घराप्रती आपलं काही कर्तव्य आहे हेही तो आपर्यंत समज नव्हता. आज मात्र आई बापांच्या उदारपणामुळे त्याला एक नवीन प्रकाश दिसला. धनिया आणि झुनिया अंगणातून घरात गेल्या हे पाहून तो शेतातल्या मांडवाखाली जाऊन बसला आणि पुढचे मनसुबे रचू लागला.

शहरात मजूराला पाच-सहा आणे रोज मिळतो असं त्यानं ऐकलं होतं. असाच रोज आपल्याला मिळाला तर आपण पोटासाठी एक आणा खर्च करू आणि पाच आणे आपण वाचवू शकू आणि अशा तऱ्हेने महिन्याला दहा तर वर्षांत सव्वाशे जमवू आणि अशी सव्वाशे रुपयाची थैली घेऊन गावाकडे परतलो तर कुणाची जाल होणार आहे मान वर करून आपल्याकडे पाहण्याची. हेच दातादीन आणि पटेश्वरी त्याच्या होत हो मिळवतील आणि झुनियाला तर गर्व वाटेल. दोन चार वर्षे अशीच कमाई होत राहिली तर घराचं सारं दारिद्र्य संपून जाईल. आता तर साऱ्या घराचं मिळूनही वार्षिक उत्पन्न सव्वाशे रुपये होत नाही. मात्र यापुढे तो एकटा सव्वाशेची वार्षिक कमाई करील. लोक एवढंच म्हणतील ना, की हा मजूरी करतो म्हणून? म्हणू देत! मजूरी करणं तर काही पाप नाही. शिवाय नेहमी करता थोडी सहा आणेच मजूरी मिळणार? आपण जशी जशी कामात प्रगती करू तशी तशी मजूरीही वाढतंच जाईल. मग आपण वडिलांना म्हणू, तुम्ही बसून भजन करा. या शेतीत जीव जाण्या शिवाय इतर काही कमाई नाही. आधी एक चांगल्या वाणाची गाय आणू, चांगलं चार पाच शेर दूध देणरी आणि दादांना सांगू तिची सेवा करायला. त्यामुळे दादाला इहलोकात सुख आणि परलोकात स्वर्ग मिळेल.

एक आण्यात तर आपल जेवण होईलंच, मग घर कशाला करायचं? कुणाच्या तरी ओसरीवर पडून राहीन झालं. नाही तरी शेकडो मंदिर, धर्मशाळा आहेतंच की. त्याहीशिवाय आपण ज्याची मजूरी करू तोही आपल्याला जागा देईलंच की. एका रुपायात दहा शेर पीठ येतं. एका आण्यात अडिच पाव असा झाला हिशेब. पीठासाठी त्याला एक आणा लागेल. लाकूड, दाळ, मीठ, भाजी कुठून आणायचं? दोन वेळेस पोट भरलं तर पाहिजे. खैर, खाण्याचं काय? मुठभर चणे खाऊनही पोट भरता येईलंच की. जशी कमाई होईल तसंच पाहू आणि जळतपणाचं काय गोवऱ्या गोळा करू, कधी डाळ तर बटाटे कधी असं खाऊ. शेवटी दिवस काढायचाय आपल्याला, चैन नाही करायची. पत्रावळीवर पीठ मळून, गोबऱ्याच्या आहारावर बाठ्या भाजून खाऊ, तो एकेक कल्पना करायला लागला.

पण लगेच त्याला शंका आली, की एखोद दिवशी मजूरी नाही मिळाली तर? लगेच त्या शंकेचं निरसनही झालं. आपण मन लावून काम केलं तर शंभर माणसं कामाला बोलावतील आपल्याला. शिवाय कुठे रात्र पाळीच काम मिळालं तर तेही आपण करूच की. दिवसभर मजूरी करायची आणि रात्री चौकीदारी! रात्रीच्या कामासाठी दोन आणे रोज जरी मिळाला तरी खूप झालं. जेव्हा आपण परत येऊ तेव्हा सर्वांसाठी साड्या आणू. झुनियासाठी कंगन आणि दादासाठी मुंडास तर पक्क आणायचं!

असेच मनाचे मांडे खात तो मांडवाखाली झोपी जायचा प्रयत्न करू लागला; पण झोप येतो कुठे थंडीमुळे. त्यानं कुडकुडत कशी बशी रात्र काढली आणि पहाट होताच वाट धरली लखनौची. वीस कोस तर आहे, तेव्हा संध्याकाळपर्यंत पोहोंचू असं त्याला वाटलं. लक्षनौमध्ये आपल्या गावचा कुठे कोण येणार, त्यामुळे आपला ठावठिकाणाला दादाला कळायचं काही कारणही नाही. असा त्यानं विचार केला. मात्र झुनियाला सांगणं आवश्यक वाटत असूनही आपण तिला कळवलं नाही याचंही त्याला वाईट वाटत होतंच. आपण झुनियाला हे सांगायला पाहिजे होतं, की तिनं घरीच राहावं आणि हे, की पैसे कमावून तो काही दिवसातंच परतेलंच. लगेच त्याच्या मनात विचार आला, की तसं सांगितल असतं तर कदाचित घरी न जात ती म्हणाली असती, की तिही त्याच्याबरोबरंच येईल. तिला घेऊन असं आपण कुठे फिरत बसणार परक्या गावी हा ही विचार त्यानं केला.

दिवस चढायला लागला. रात्री त्यानं काही खाल्लेलं नव्हतं. आता पोटात कावळे ओरडायला लागले. पाय अडखळायला लागले. कुठे तरी थांबून विश्रांती घ्यावी, काहीतरी खाल्ल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. असंही त्याला वाटायला लागलं; पण जवळ तर एकही पैसा नाही. रस्त्याच्या काठावर बोरीची झाडं होती. त्याची बोरं घेऊन खात खात तो चालायला लागला. वाटेत एका गावात गुऱ्हाळ लागलं होतं आणि सुगंध रस्त्यावर पसरला होता. त्या सुगंधानं मात्र त्याचं पोट खवळलं. गुऱ्हाळावर जाऊन त्यानं पाण्यासाठी दोर आणि लोटा मागीतला. पाणी काढून हाताच्या तो पाणी प्यायला लागला. तेव्हा गुऱ्हळवाला शेतकरी म्हणाला, ''अरे बाबा नुसतं पाणीच पीणार का? थोडसं गोड धोडही खा. या वर्षापुरतं गुळ आणि खांडसरी, पुढच्या वर्षांसारखं कारखाना येणार आहे. सारा उभा उस विकल्या जाईल. गुळ आणि खांडसरीच्या भावात साखर मिळेल तेव्हा आमचा गुळ कोण घेईल?'' त्या शेतकऱ्यानं एका मोठ्या वाटीत छोट्या छोट्या आकाराचे गुळाचे खडे त्याच्या पुढे आणून ठेवले. गोबरनं गुळ खाऊन पाणी पिलं तेव्हा त्या शेतकऱ्यानं त्याला विचारलं, ''तंबाखू ओढतोस का?'' तेव्हा गोबर खोटं बोलला आणि नाही म्हणाला. म्हातारा खुश झाला. ''फार चांगलं करतोस पोरा. तंबाखू ओठण्याचं व्यसन वाईटंच. एकदा जडलं, की सुटतंच नाही.''

पोटापाण्याची सोय झाली . तशी त्याची चालही तेच झाली. हिवाळा दिवस. दुपार केव्हा झाली कळलंच नाही. वाटेत त्यानं पाहिलं, एक स्त्री रुसून बसली होती आणि तिचा नवरा तिला मनवत होता. दोनचार वाटसरू तो तमाशा पाहत उभे होते. गोबर सुद्धा तिथेच उभा राहिला. ती स्त्री म्हणाली, ''मी जाणार नाही!''

तो निर्वाणीच्या आवाजात बोलला, ''नाही जाणार?''

''नाही जाणार!''

''नाही जाणार?'' त्यानं आणखी आवाज चढवत विचारलं.

''नाहीच जाणार!''

त्यावर त्यानं तिचे केस धरले आणि तिला फरकटत न्यायला सुरुवात केली. तेव्हा ती जमिनीवर पडली. आता मात्र त्यानं हार मानली आणि तो म्हणाला, ''मी तुला मुकाट्यानं चल म्हणतो.''

''मी तर सात जन्म तुमच्या घरात जाणार नाही. वाटलं तर माझे तुकडे करा!''

''मी तुझा गळाच कापून टाकीन.''

''तर मग तुम्हाला फासावर जावं लागेल.''

तेव्हा त्यानं तिचे केस सोडले, डोक्यावर हात ठेवून तो मटकन खाली बसला. पौरुषाचा अंतिम टोकावर तो पोहोंचला होता आणि यापुढे काही करता येण्यासारखं नाही हे त्याच्या लक्षात आलं. शेवटी हार मानून तो उभा राहिला आणि म्हणाला, ''तुला पाहिजे तरी काय?''

''तू मला सोडून द्यावस हीच माझी इच्छा आहे.''

''काय झालं हे तर सांगशील मला.''

''माझ्या आई-वडिलांना शिव्या द्याव्या?''

''कुणी दिल्या शिव्या?''

''जाऊन तुझ्या घरी तर विचार.''

''तू घराकडे आलीस तरंच विचारता येईल ना!''

''तू काय विचारशील! तुझ्यात काय दम आहे? जाऊन आईच्या पदराखाली तोंड लपव आणि झोप. ती तुझी आई असेल, माझा काही संबंध नाही. तिच्या शिव्या तू ऐक मी का ऐकू? एक भाकरी मला खाऊ घालतात तर चार भाकरीचं काम मी करते. काय म्हणून कुणाच्या धमक्या सहन करू?''

जमलेल्या वाटसरूना तो तमाशा पाहण्यात मजा वाटत होती; पण तो तमाशा संपायची चिन्ह काही दिसेनात. तेव्हा एकेक करून माणसे सरकायला लागली. गोबरला त्या पुरुषाच्या दुष्टपणाबद्दल वाईट वाटत होतं. सगळे लोक गेलेले पाहून तो त्याला म्हणाला, ''हे बघा, नवरा बायकोच्या भांडणात कुणी पडायला तर नाही पाहिजे; पण एवढी निर्दयता बरी नाही!''

रागानं डोळे वटारून तो म्हणाला, ''तुम्ही कोण मला विचारणारे?''

त्याबद्दल काहीही वाटू न देता गोबर म्हणाला, ''मी कुणीही असेल; पण एखादी वाईट घटना घडताना पाहताना कुणालाही वाईटंच वाटेल.''

तो माणूस मान हलवत म्हणाला, ''घरात बायको आली नाही म्हणून एवढं वाईट वाटतंय!''

''घरात बायको आली तरी तिला असे केस धरून फरफटणार नाही.''

''ठीक आहे. आपला रस्ता धरा. ती माझी पत्नी आहे. तिला मी मारीन, नाही तर तिचा गळा धरीन, तुम्ही कोण मला विचारणारे? मुकाट्याने चालायला लागा, इथे उभा राहू नका.''

गोबरचं रक्त आधीच गरम आता तर अधिकंच गरम झालेलं. म्हणाला, ''सडक सरकारची आहे. कुणाच्या बापाची नाही. मला वाटेल तेवढा वेळ मी इथे उभा राहिन. मला इथून जा म्हणायचा अधिकार कुणाला नाही.''

''तुम्ही जाणार नाही तर! मग मी येऊ?''

गोबरनं त्याचं उपरण कंबरेला बांधलं, हाबुक ठोकून तो हाणामारीला तयार झाला आणि म्हणाला, ''तुम्ही या वा नका येऊ. हा मी तयार झालो. मला वाटेल तेव्हाच मी जाईन!''

''हात पाय तुटल्यावरंच जायचंय तर!''

''आता हे कुणाला ठाऊक, हातपाय कुणाचे तुटणार ते?''

''तर तुम्ही जाणार नाही?''

''नाही!''

मूठ आवळून तो माणूस गोबरच्या अंगावर धावून येणार तोच त्या स्त्रीनं त्याचं धोतर पकडलं, त्याला ओढत ती गोबरला म्हणाली, ''तुम्ही का या भानगडीत पडता? आपल्या वाटेनं का नाही जात? इथे काही तमाशा चाललाय का? आमचं आपसातलं भांडण आहे. कधी तो मला मारतो, कधी मी त्याला राग भरते; पण तुम्हाला त्याच्याशी काय करायचंय?'' तिच्या या झटक्यानं गोबर मार्गी लागला. मनातल्या मनात म्हणाला, ''ती स्त्री मार खाण्याच्याच योग्यतेची आहे.''

गोबर पुढे गेल्यावर ती स्त्री तिच्या नवऱ्याला म्हणाली, ''तुम्ही ज्याच्या त्याच्याशी भांडता कशाला? तो असं काय बोलला, की लगेच तुम्हाला राग यावा? वाईट काम केलं तर जग वाईटंच म्हणेल; पण हा माणूस चांगल्या घरचा आणि आपल्याच बिरादरीचा असावा. तुमच्या बहिणीसाठी त्याला का नाही विचारत?''

शंकित स्वरात त्यानं विचारलं, ''पण आतापर्यंत तो बिन लग्नाचा राहिला असेल?''

''अहो विचारून तर पहा.''

पळत पळत जाऊन त्यानं गोबरला हाक मारली आणि थांबायची खूण केली. गोबरला वाटलं याच्या डोक्यात परत संताप येऊन हा मारायला तयार झाला, की काय? मार खाल्ल्याशिवाय हा सरळ नाही व्हायचा. आपल्याच गावात तर कुत्राही वाघच असतो. येऊ द्या बेट्याला, पाहूचयात! पण त्या माणसाच्या चेहऱ्यावर भांडणाची लक्षणं दिसत नव्हती; पण मैत्रीची भावना असावी असं मात्र वाटत होतं. त्यानं गोबरचं नाव, गाव, जात इत्यादी विचारून घेतलं. त्या माणसाचं नाव कोदई होतं. गोबरनं त्याला ठीक ठीक सारी माहिती दिली.

कोदई - तो माणूस म्हणाला, ''आपल्या दोघात भांडण होता होता राहिलं. तुम्ही निघून गेल्यावर मला वाटलं तुमचं म्हणणं ठिक होतं. मी उगाच भांडलो तुमच्याशी. तुमच्या घरी शेती तर असेलंच ना?'' गोबरनं त्याची पुर्वापारची पाच बिघे जमीन असल्याचं सांगितलं. एका औतीची शेती आहे असंही तो म्हणाला.

''मी तुम्हाला काही कमी जास्त बोललो त्याबद्दल माफी मागतो. रागानं माणूस आंधळा होतो. बायको तशी लक्ष्मी आहे; पण अधून मधून तिच्या डोक्यात काय राग बसतो कुणास ठाऊक? आता तुम्हीच सांगा आई पुढे मी काय करू शकतो? तीनंच तर जन्म दिलाय, पालन पोषण केलंय. काही कमी जास्त झालं तर मी सांगीन माझ्या पत्नीलाच, तिच्यावर तर आपला हक्क असतो. तुम्हीच सांगा, मी काही चूक बोलतो आहे का? हां, मात्र मी तिचे केस धरून ओढायला नको होते; पण बायकांना काही शिक्षा केल्या शिवाय त्या मार्गावर येत नाहीत, हेही तेवढंच खरं. तिची इच्छा आहे मी आईपासून वेगळं रहावं. तुम्हीच सांगा, मी कसं काय वेगळं राहू आणि कुणापासून वेगळं राहू? मला जन्म देणाऱ्या आईपासून? ते तर शक्यच नाही. मग हिला जाऊ दे कुठे जायचं असेल तिथे.''

आता गोबरलाही आपलं मत बदलावं लागलं, ''आईवर निष्ठा ठेवणं तर सर्वांचाच धर्म आहे भाऊ. तिच्या ऋणातून कोण मुक्त होऊ शकतं?'' तेव्हा कोदईनं त्याला घरी येण्याचं आमंत्रण दिलं. नाही तरी आता तो आजच लखनौला पोहोंचू शकतंच नव्हता. कोस दोन कोस जाईपर्यंतच अंधार पडला असता आणि रात्री कुठेतरी अनोळखी ठिकाणी थांबावं लागलं असतं. आता ते टळणार होतं. त्यानं गमतीनं विचारलं, ''बायकोनं मानलं का?''

''न मानून करते काय?''

''मला तर ती असं बोलली, की मी तर नरमलोच.''

''त्याबद्दल तर तिला स्वतःलाच पश्चात्ताप वाटायला लागलाय. घरी चला आणि आईला समजावून सांगा. माझ्याच्यानं तर काही बोलवत नाही. आईलाही कळालं पाहिजे, की आईबापावरून काही कुणी शिव्या देत नसतात. आमची सुद्धा एक बहिण आहे. चार दिवसात तीचंही लग्न जमेल. तिची सासू जर आम्हाला शिव्या देऊ लागली तर आम्हाला ऐकवेल का? सगळा दोष काही सुनेचाच नाही. आईचाही दोष आहेच. प्रत्येक गोष्टीत तिनं तिच्याच मुलीचा पक्ष घेतला तर आम्हालाही वाईट वाटेलंच ना! शिवीला उत्तर शिवीनं तर देता येत नाही ना? त्यापेक्षा घर सोडून गेलेलं बरं!''

गोबरला रात्रीचा मुक्काम कुठे तरी करायचा होताच. तेव्हा कोदईच्या गावाकडे जायला म्हणून तो आणि कोदई, ती स्त्री बसली होती तिथे आले. आता ती गृहिणीसारखी लाजत होती आणि तिनं तोंडावर पदरही ओढला होता. जवळ आल्यावर कोदई तिला म्हणाला, ''हे तर यायला तयारंच नव्हते. म्हणत होते, एवढं फटकारण ऐकल्यावर घरी कसं काय यावं?''

पदराआडून ती स्त्री म्हणाली, ''एवढ्याशा बोलण्यानं घाबरलात? बायको आल्यावर काय कराल?''

गाव जवळंच होतं. गाव कसला पंधरा वीस घरांची वस्ती होती झालं. पैकी अर्धी घर खापराच्या छताची तर अर्धी गवतानं झाकलेली. घरी आल्यावर कोदईनं बाज टाकली. त्यावर सतरंजी टाकली आणि गुळपाणी आणायला सांगून चिलीम भरली. काही क्षणातंच कोदईची बायको गुळपाणी घेऊन आली. एक थेंब गोबरच्या अंगावर उडवल्यासारखा करून तिनं गोबरची क्षमा मागितली. गोबर आता तिच्या नणंदेचा नवरा होणार होता, मग आतापासूनंच त्याची थट्टा का नाही करायची?

गोबर भल्या पहाटेच उठला आणि त्यानं कोदईजवळ जाण्याची परवानगी मागितली. एव्हाना त्याचं लग्न झाल्याचं सर्वांनाच कळलं होतं. त्यामुळे लग्नाबाबद कुणी त्याच्याशी बोललं नाही. त्याच्या स्वभावानं घरातले सारेच खुश झाले होते. कोदईच्या आईला त्यानं मोठ्या गोड शब्दात आणि तिच्या मातृत्वाचा पूर्ण आदर करत उपदेश असा केला, की आई तर खुश झाली आणि तिनं त्याला आशीर्वाद दिला.

''आई, तुम्ही महान आहात. पुजनिय आहात. शंभर जन्म घेऊनही मुलगा आईच्या ऋणातून मुक्त होऊच शकत नाही. ला, जन्म घेतले तरी नाही. कोटी कोटी जन्म घेऊनही नाहीच...''

कोटी कोटी जन्माचा एवढा मोठा संदर्भ ऐकून तर आई गदगदलीच. त्यापुढे तो जे काही बोलला त्यात तर तिला तिच्याच हिताचं वाटायला लागलं. वैद्यानं रोग्याला दिलेलं औषध एकदा का लागू पडलं तर त्यानंतर त्याना विष जरी दिलं तरी रौ विश्वासानं तेही घेतो. आता आज सून रुसून घराबाहेर गेली तर बदनामी कुणाची झाली? सुनेला ओळखतं कोण? कुणाची मुलगी, कुणाची नात कोण ओळखतं? कदाचित ती एखाद्या भोरवाल्याची मुलगीही असेल...

''हो तर.'' म्हातारी आई म्हणाली. गवत विकणाराच आहे. त्याचं तोंड पाहिलं तर दिवसभर पाणीही प्यायला मिळणार नाही.

''मग मला सांगा अशा माणसाची काय मानहानी होणार आहे? ज्यांनी ज्यांनी चौकशी केली त्यांनी हेच विचारलं, 'सून कुणाची आहे?' नाही तरी ती पोरगीच आहे. नादान, अल्लड! नीच आईबापाची. एकदम चांगली कशी होईल? या पोपटाला तर तुम्हालाच रामनाम शिकवावं लागणार आहे. मारून तर पोपट शिकणार नाही. तिला शिक्षा करा; पण अपमान दुरुत्तर करू नका. तिचं काही नुकसान होणार नाही. अपमान होईल तो तुमचा!''

**क्रमशः**

**- अनंत उमरीकर**

नानल पेठ, परभणी -४३१४०१. मो. ९८९०३९६६५७

■■

**पान २८ हून पुढे**

की गावातच घुटका खाऊन, तालुक्याला गाडीत पेट्रोल टाकून जाऊन, आडतीवर उचल घेऊन पोटात चार पेग टाकल्याशिवाय समाधानच न वाटणे सुरू झाले आहे. आज जो कोणी पैसे कमावतो ते सकाळी सकाळी पानाच्या गादीवाल्याचे देणे लागते म्हणून पेट्रोलपंपवाल्याचे पेट्रोल विकले जावे म्हणून, मॉलवाल्याचे गिऱ्हाईक व्हावे म्हणून, थेटरवाल्यांचा पिक्चर चालावा म्हणून आणि रात्री हॉटेलवाल्यांचा धंदा चालावा म्हणून... जो कोणी ही समाजव्यवस्था चालू राहावी म्हणून प्रयत्न करतो त्याला शेती विकावी लागते, शेती विकली की, खेड्याशी असलेली नाळ हलकेच तुटते, ही नाळ तुटली की, शहरात सुंदर असे निर्वासीत जीवन जगता येते, रूटलेस फॅमिली म्हणून नंतर जग ओळखते. नाहीतरी या जगात आपण उपरेच म्हणून आलो आहोत, ही जाणीव झाली तरी या उपऱ्यांसाठीही कोणीतरी पाणी देऊन जलदानाचे पुण्य कमावत असतोच. आता पाप-पुण्याच्या कल्पना बदललेल्या असल्या तरी पुण्यभूमीतील असे उदात्त पुण्यस्वप्न पाहणाऱ्या पुण्यवंतांचे स्वप्न पूर्ण होऊन त्याला पुण्यभूषण पुरस्कार मिळण्यासाठी तरी काही मावळ्यांनी शहीद व्हावे हे आम्हा साऱ्या शेतकऱ्यांचे भूमातेला साकडे घालणे औचित्याचे ठरणार आहे. नाहीतरी महंत रवींद्रनाथ म्हणूनच गेले आहेत की,

**जमिनीवरती पडोत भेगा, जमोत सारी गिधाडे**<br>
**इतके ताजे अन्न पाहूनी, तोंड राहू दे उघडे**<br>
**साव बनूनी लुटोत लुटारी, मद्यधुंद माकडे**<br>
**जळण्याआधीच काढून घ्या हो, रचलेली लाकडे**<br>
**हडळींचेही रूप गोजीरे, व्याधीस की साकडे**<br>
**पाणी-पाणी म्हणून उठू दे, मेलेल्यांचे जबडे**<br>
**ललाट होवो शिशिर उत्तर, रोजच भय त्रांगडे**<br>
**म्हणू दे यांचे देह खाऊ या, इथली सारी गिधाडे !!**

महंतांच्या या उपदेशामृतातून जे सिद्ध होते त्यात त्यांनी गिधाडंचे दिवस येणार म्हणून जे अमृत प्राशले आहे त्या अमृतवर्षावासाठी का होईना मावळच्या घटनेपासून तरी शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडो हीच कलीचरणी प्रार्थना!

बोला, उद्ध्वस्तनाथ महाराज की जै!!

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**

**मु. पो.** thandamaharaj@gmail.com

टेम्परसी टूजी कार्ड संपर्क क्र. ९४२१८३९६६९

■■